# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जुलै २००५
◆ वर्ष पाचवे
◆ अंक सातवा

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

## — *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **पुस्तक परिचय** | |
| **मंत्र श्रीमंतीचा** : श्याम भुर्के | २१ |
| **बंडखोर : ओशो** : अनु. माधुरी काबरे | ३३ |
| **गॉन फॉर गुड :** अनु. अजित ठाकूर | ४० |
| **पुरस्कार** | ४७ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ५० |
| **श्रद्धांजली** | ५४ |
| **बालनगरी** | ५५ |

✠ मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-२४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

**प्रकाशनक्षेत्रात चीनची घोडदौड**

मराठी ग्रंथव्यवहाराबद्दल बोलताना नेहमी अंदाजपंचे बोलावे लागते. मराठीत दरवर्षी किती पुस्तके प्रकाशित होतात? प्रकाशक वा प्रकाशन संस्था किती आहेत? सर्वात जास्त खपणाऱ्या पुस्तकांची विक्री किती होते? सर्वात जास्त आवृत्त्या निघालेली पुस्तके किती? एकेका प्रकाशन संस्थेची वार्षिक उलाढाल किती? वर्षाला पाच कोटींचा वा अधिक ग्रंथव्यवहार करणाऱ्या प्रकाशन संस्था किती व कोणत्या? ग्रंथालये आणि वाचनालये. दरवर्षी किती रकमेची पुस्तके खरेदी करतात? पाठ्यपुस्तक मंडळातर्फे वर्षाला किती पुस्तके निघतात? किती विक्री होते? शाळा-कॉलेजची पाठ्यपुस्तके आणि गाइडस किती खपतात? त्यांचे प्रमुख उत्पादक आणि लाभार्थी कोण? शंभर वर्षावर वा पन्नास वर्षंवर अखंड वाटचाल करीत असलेल्या प्रकाशन संस्था आहेत का? किती? कोणत्या? असे कितीतरी प्रश्न समोर येतात; परंतु त्यांची नेमकी उत्तरे सहजासहजी मिळू शकत नाहीत. कारण तसे खास अभ्यास वा संशोधन झालेले नाही. तसे ते होण्याची गरज आहे.

या दृष्टीने चीनमध्ये होत असलेल्या काही उपक्रमांची नोंद घेणे आपल्याला श्रेयस्कर ठरू शकेल.

चीन हा लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील अग्रगण्य देश आहे. १३५ कोटीच्या घरात चीनची लोकसंख्या आहे. भारताचा क्रमांक दुसरा आहे. ११० कोटीचा टप्पा भारतीय लोकसंख्येने गाठला आहे. या दोन्ही देशांची महासत्ता बनण्याकडे दौड चालू आहे. चीन आणि भारत दोन्ही देशांना जवळजवळ एकाच वेळी स्वातंत्र्य मिळाले. कम्युनिस्ट राज्यप्रणाली स्वीकारून चीनने तीसपस्तीस वर्षे तेथील समाजाचे सर्व पातळ्यांवर कठोर नियंत्रण करून प्रत्येक क्षेत्र सरकारी अमलाखाली आणले. देशव्यापी फतवे काढून अनेक मोहिमा राबवल्या. एका जोडप्याला एकच मूल हे धोरण ठेवून लोकसंख्येला प्रभावीपणे आळा घातला. चिमण्या अन्नधान्याची खूप नासाडी करतात हे कोणा तरी चिनी नेत्याच्या डोक्यात आले, आणि चीन सरकारने देशातल्या सर्व चिमण्यांना मारून टाकण्याची मोहीम राबवली. त्याचा पर्यावरणावर घडलेला प्रतिकूल परिणाम पाहून आता पक्ष्यांच्या वाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत हेही येथे सांगायला हवे. स्त्री-पुरुष सर्वांनी एकसारखा निळा पोशाख घालायला हवा असे ठरवून, त्याचे काटेकोर पालन करण्यात आले. तेथील कापड गिरण्यांवर एकाच प्रकारचे निळे कापड उत्पादित करण्याची सक्ती करण्यात आली... परंतु अति झाले की सगळेच उलटेपालटे होते. रशियातील कम्युनिस्ट राजवट कोसळली, रशियाची अनेक राज्ये स्वतंत्र झाली आणि चीनमध्येही खुलेपणाचे, उदारीकरणाचे धोरण स्वीकारले गेले. जागतिक बाजारपेठेत मुसंडी मारण्याचे चीनने ठरवले. परदेशी भांडवलाला चीनची बाजारपेठ खुली केली. अनेक अमेरिकन कारखानदारांनी चीनमध्ये आपले भांडवल घालून कारखाने उभारून त्यात स्वस्त चिनी कामगारांकडून मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू केले आणि त्या उत्पादनातील ८०/९० टक्के माल अमेरिकेत निर्यात करून अमेरिकन दुकानांतून विकण्याची व्यवस्था केली. त्यामुळे चीनमधील लोकांना नव्याने रोजगार मिळाला, चिनी अर्थव्यवस्था सुधारली आणि अमेरिकेलाही स्वस्तात आवश्यक त्या दर्जाचा माल मुबलक मिळू लागला. अमेरिकेत वेतनमान खूप असल्याने तोच माल उत्पादन करायला जास्त खर्च येत असे. चीनमुळे तो माल कमी दरात उपलब्ध झाल्यामुळे अमेरिकेची सोय झाली. आज अमेरिकन दुकानांमध्ये कुठेही जा, 'मेड इन चायना' माल सत्तर ऐंशी टक्के दिसेल. साध्या पेपर नॅपकिनपासून संगणकाच्या सुट्या भागापर्यंत सर्व प्रकारच्या वस्तू अमेरिका आज चीनमध्ये स्वत:च्या काटेकोर व्यवस्थापनाखाली बनवून घेत आहे आणि आपल्या उत्पादनात त्यांचा वापर करून आपल्या खर्चात प्रचंड बचत करीत आहे.

भारतही निर्यातवाढ करण्यासाठी प्रयत्नशील आहे; परंतु भारताची निर्यात तयार कपडे, औषधे, पादत्राणे, खनिजे, फळफळावळ, मसाल्याचे पदार्थ वगैरे 'कच्च्या'मालापुरती मोठ्या प्रमाणावर सीमित आहे. औद्योगिक उत्पादनांची निर्यात करण्याच्या दृष्टीने आपण चीनच्या खूपच मागे आहोत. मात्र आपले बुद्धिमान तरुण अमेरिकेतील माहिती तंत्रज्ञानक्षेत्रात आज आघाडीवर आहेत. अनेक कंपन्यांसाठी आउटसोर्सिंग करण्याचे कामही भारतात चाललेले असते; त्यामुळेही आपल्याला चांगले उत्पन्न मिळते. आपल्या प्रशिक्षित पदवीधर तरुणांना भरपूर पगाराच्या नोकऱ्याही सहज मिळतात. आयटी बरोबर भारतीय चित्रपट आणि पुस्तके यांचीही निर्यात मोठ्या प्रमाणावर होण्यास वाव आहे असे दिसते. चीननेही आपले चित्रपट, आपली पुस्तके ही जगभर जाण्याच्या दिशेने जागरुकपणे प्रयत्न चालवलेले आहत. त्या दृष्टीने चीन आणि भारत या दोघांनाही एकमेकांचे स्पर्धक यापेक्षा सहकारी म्हणून आपला प्रभाव टाकता येईल.

भारतीय प्रकाशनव्यवसायापेक्षा चीनमधील प्रकाशनव्यवसायाचे स्वरूप भिन्न होते. कम्युनिस्ट राजवटीत सर्व ग्रंथप्रकाशनसंस्था आणि वृत्तपत्रसंस्था या सरकारच्या मालकीच्या आणि नियंत्रणाखाली होत्या. कोणालाही खाजगीरीत्या पुस्तक, वृत्तपत्र वा मासिक काढता येत नसे. पाठ्यपुस्तकांचेही पूर्णतया राष्ट्रीयीकरण झालेले होते. १९८० नंतर मात्र खाजगी प्रकाशनसंस्थांना पुस्तके काढण्याची परवानगी देण्यात आली. १९८० पासून चीनच्या ग्रंथव्यवहारात दरवर्षी दहा ते वीस टक्के

आणि १९९० पासून ८ ते १० टक्के वाढ होत आहे. नवी विक्री केंद्रे निघत आहेत. सरकारी प्रकाशनसंस्था आहेतच, परंतु तेरा मोठ्या प्रकाशनसंस्थांनीही शेकडो पुस्तकांचे प्रकाशन करून तेथील ग्रंथनिर्मिती आणि वितरण यात क्रांती करून टाकली आहे. देशी-परदेशी खाजगी भांडवल चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रकाशन-संज्ञापन येत आहे.

या वाढत्या ग्रंथव्यवहाराचा अंदाज घेण्यासाठी चीनमध्ये राष्ट्रीय पातळीवरचे एक सर्वेक्षण करण्यात आले. त्यावरून लक्षात आलेल्या काही गोष्टी भारतालाही थक्क करतील.

* चीनमध्ये पुस्तकांची विक्री वर्षाला ७० अब्ज युआॅन म्हणजे ८.४५ अब्ज डॉलर्सची होते. एक बिलियन (अब्ज) डॉलर्स म्हणजे ४४०० कोटी रुपये.

* वर्षाला १ अब्ज युआॅनपेक्षा जास्त ग्रंथ विक्री करणाऱ्या पन्नासावर वितरणसंस्था आहेत.

* पुस्तकांची सुमारे ८० हजार विक्रीकेंद्रे, ग्रंथदालने आहेत

* शैक्षणिक पाठ्यपुस्तकांची विक्री एकूण ग्रंथव्यवहारात ७१ टक्के.

* चीनच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनात पुस्तके व मुद्रित सामग्रीचा भाग १.७ टक्के आहे. त्यामुळे १९४ अब्ज युआॅनच्या अतिरिक्त मूल्याची भर पडलेली आहे.

* चीनमध्ये २००३ या वर्षी १ लाख १० हजार पुस्तकांच्या नव्या आवृत्त्या निघाल्या. त्यात १९००० नवी पुस्तके प्रकाशित झाली. (हेच आकडे ब्रिटनबाबत १ लाख २० हजार पुस्तके आणि अमेरिकेबाबत १ लाख ७५ हजार असे आहेत.) भारतात वर्षाला ८० हजार पुस्तके निघतात.

* ग्रंथसंख्येच्या दृष्टीने चीन हा जगातील सर्वात जास्त पुस्तके प्रकाशित करणारा देश आहे. मात्र या पुस्तकांच्या किंमती कमी असल्याने अमेरिकेतील पुस्तक उत्पादन ३० अब्ज डॉलर्सच्या घरात होते, तर चीनचे फक्त ५.६ अब्ज डॉलर्स एवढेच होते.

* खाजगी व शासकीय प्रकाशन क्षेत्रातील पुस्तकांचे प्रमाण ५०/५० टक्के असे आज आहे. यापुढे खाजगीकरणावर भर राहणार असल्याने हे प्रमाण बदलणे अपरिहार्य आहे.

* चिनी माणूस दरवर्षी पुस्तकावर ३.९ डॉलर्स खर्च करतो. अमेरिकन माणूस ९३ डॉलर्स खर्च करतो. फ्रेंच लोक हे पुस्तकावर सर्वात जास्त प्रेम करतात. फ्रेंच माणूस दरवर्षी १२२ डॉलर्सची पुस्तके विकत घेतो. (१९९९ च्या आकडेवारीनुसार)

* बैरोंग ग्लोब (बीजिंग) कल्चर डेव्हलपमेंट ही प्रकाशन-वितरण संस्था सर्वात आघाडीवर असून, या संस्थेने एप्रिलमध्ये बीजिंगमध्ये आशियातील सर्वात मोठे ग्रंथदालन सुरू केले आहे. १५ हजार चौरस मीटर एवढा त्याचा विस्तार आहे. पुस्तक प्रकाशन हा सर्वात फायदेशीर व्यवसाय आहे असे तेथे मानले जाते.



* जानेवारीत भरणारी बीजिंग बुक फेअर ही चीनमधील सर्वात मोठी ग्रंथजत्रा असते. यंदा तिच्यात १९३५ प्रकाशन संस्थांचे स्टॉल होते. (त्या अगोदरच्या वर्षापेक्षा ३०० अधिक)


* वर्ल्डट्रेड ऑर्गनायझेशन बरोबर झालेल्या करारानुसार चीन अनेक उद्योगधंद्यांप्रमाणेच ग्रंथ प्रकाशन आणि प्रिन्ट मीडिया यातही खुलेपणाचे धोरण राबवून परदेशी भांडवलाला व स्पर्धेला मोकळीक देत आहे. त्यामुळे परदेशातून येणाऱ्या दर्जेदार पाठ्यपुस्तकांचे व अन्य पुस्तकांचे प्रमाण व वितरणही अधिक होण्याची शक्यता आहे. या नव्या स्पर्धेत टिकण्यासाठी आपल्या पुस्तकांचा आशय व निर्मिती दर्जा वाढवण्याची निकड चिनी प्रकाशकांना जाणवत आहे. त्यामुहे त्यांच्यातील आत्मसंतुष्ट वृत्तीला धक्का बसला आहे. सरकारी नियंत्रणाखालील प्रकाशनसंस्थाही स्वायत्त बनून इतर प्रकाशन संस्थांमध्ये विलीन होत आहेत. त्यांच्या व्यवस्थापनात आणि तांत्रिक सुविधात आधुनिकता आणली जात आहे.

* पुस्तकांना देण्यात येणारे राष्ट्रीय पुरस्कार आणि प्रादेशिक पुरस्कार यात अनुक्रमे ५५ टक्के आणि ३६ टक्के वाढ करण्यात आली आहे.

देशातील ग्रंथव्यवहार वाढणे, ग्रंथव्यवहाराला आंतरराष्ट्रीय स्वरूप येणे, आपली पुस्तके जगभर वेगवेगळ्या देशात जाणे, ज्ञानक्षेत्रातील आदानप्रदान वाढणे या दृष्टीने पुढचा काळ हा आव्हानात्मक आहे.

चीन आणि भारत या दोघांनाही या नव्या संधीचा फायदा उठवता यायला हवा.

इंग्लिश पुस्तकांच्या प्रकाशनक्षेत्रात अमेरिका इंग्लंड यांच्यानंतर भारताचा क्रम लागतो. चीन-भारत सहकार्याने या क्षेत्रातील आपल्या अग्रेसरपणाचा लाभ उठवता येण्याचे मार्ग शोधावे लागतील. चीनमध्ये आपल्या इंग्रजी पुस्तकांना मोठी बाजारपेठ मिळू शकेल.






# कबंध

रत्नाकर मतकरी

**अभिप्राय** - *झपाटून टाकणारे, थरार उठवणारे भन्नाट पुस्तक. एखादी सस्पेन्स सिरियल पाहण्यापेक्षाही मनाचा विलक्षण कब्जा घेणाऱ्या कथा. वाचताना अंगावर काटा उभा राहतो.* - प्रिया भागवत (विद्यार्थिनी)

***किंमत : १००रु. सभासदांना : ७५रु. पोस्टेज : २०रु.***



# साहित्यवार्ता

## * मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी कोत्तापल्ले

ज्येष्ठ समीक्षक आणि पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झाली आहे. ते या पदावर पाच वर्षे असतील.

कुलगुरुपदी निवड झाल्यावर कोत्तापल्ले म्हणाले, ''मी मूळचा मराठवाड्यातील आहे. मराठवाडा विद्यापीठातच मी शिक्षण घेतले. पीएच.डी.ही तेथेच केली आणि तेथे १९ वर्षे अध्यापनही केले. आता दहा वर्षानंतर तिथे परत नव्या जबाबदारीसह जात आहे. या विद्यापीठाचा मला अभिमान आहे. हे विद्यापीठ वैशिष्ट्यपूर्ण आहे. मुख्य म्हणजे वंचित गटातील विद्यार्थी येथे बहुसंख्येने आहेत. विद्यापीठातील वस्तुसंग्रह, पारसनीस संग्रह, हस्तलिखितांचा संग्रह ही बलस्थाने आहेत. काही विभागही नावाजलेले आहेत. या सर्वांत भर घालण्याचा प्रयत्न मी करेन.''

''अभ्यासक्रम अद्ययावत करणे गरजेचे आहे. माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आदींसह सध्या अनेक नवनवीन तंत्रज्ञान क्षेत्रे विकसित होत आहेत. विद्यार्थ्यांना हे अद्ययावत शिक्षण देणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात अनेक नव्या पद्धती येत आहेत. श्रेयांक (क्रेडिट) पद्धत ही त्यापैकीच एक. श्रेयांक आणि सत्र पद्धतीचा अवलंब करावा, अशा सूचना विद्यापीठ अनुदान मंडळानेच (यूजीसी) यापूर्वी केल्या आहेत. पुणे विद्यापीठात या पद्धतीचा अवलंब होत आहे. अन्य काही विद्यापीठांतही तो केला जाणार आहे. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ त्यात मागे राहणार नाही, हे पाहिले जाईल.''

जागतिकीकरण, खासगी विद्यापीठे, परदेशी विद्यापीठांची स्पर्धा यांबद्दल डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''जागतिकीकरणामुळे येणारी स्पर्धा ही आपल्याला उपयोगी ठरू शकेल आणि पारंपरिक विद्यापीठांचा दर्जा वाढू शकेल. उत्तम शिक्षणाद्वारेच आपण या स्पर्धेत टिकणार आहोत. दुसरे म्हणजे मुळातच सात टक्के युवक उच्च शिक्षण घेतात. उर्वरित ९३ टक्क्यांना उच्च शिक्षण देण्यासाठी पारंपरिक विद्यापीठेच मदतीला येणार आहेत.''

डॉ. कोत्तापल्ले दहा वर्षांपासून पुणे विद्यापीठात आहेत. ते येथील आंबेडकर अध्यासनाचे समन्वयक आहेत. त्यापूर्वी ते आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात होते. दोन्ही विद्यापीठांच्या विविध अधिकार मंडळांवर त्यांनी काम केले आहे. साहित्य क्षेत्रातही ते ख्यातनाम आहेत. कथालेखन, कविता आणि समीक्षा यांमुळे ते प्रसिद्ध आहेत. वाङ्मयकोशाचे ते संपादक होते. राज्य मराठी विकास संस्था,



साहित्य अकादमी यांचे सदस्यत्व त्यांनी भूषविले आहे. अनेक विद्यापीठांच्या मराठी अभ्यास मंडळांचे ते सदस्य आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सात विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी मिळविली आहे.

## * साहित्य व साहित्य संस्था टिकवल्यासच समाज टिकेल

''साहित्य आणि साहित्यसंस्था टिकवा, तरच तुमचा समाज टिकेल,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी केले. ''बदलत्या परिस्थितीत या साहित्य संस्था अधिक कार्यक्षम करायच्या असतील, तर त्यांचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे,'' असे मतही त्यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शताब्दी महोत्सव शुभारंभ सोहळ्याचे उद्घाटन राज्याचे सहकारमंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते झाले. आमदार उल्हास पवार, यशवंतराव गडाख आदी या वेळी उपस्थित होते. मराठी साहित्यात लक्षणीय भार घातल्याबद्दल देण्यात येणारे 'म. सा. परिषद पारितोषिक' ज्येष्ठ लेखक डॉ. वि. रा. करंदीकर यांना, तर 'डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' देऊन समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना सन्मानित करण्यात आले.

विश्वास पाटील यांच्या 'चंद्रमुखी'ला वा. म. जोशी कादंबरी पुरस्कार देण्यात आला. इतर ग्रंथकार आणि ग्रंथ पारितोषिकेही या वेळी प्रदान करण्यात आली. डॉ.गं.ना. जोगळेकर यांनी प्रास्ताविक केले.

प्रा. जाधव म्हणाले, ''साहित्य संस्थांची सध्याची संरचना स्पृहणीय आहे. मात्र, बदलत्या परिस्थितीत त्याबाबत पुनर्विचार आवश्यक आहे. यामध्ये प्रत्येक प्रदेशाला योग्य प्रतिनिधित्व मिळायला हवे. त्या दृष्टीने कोकण साहित्य परिषदेलाही अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळावर प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. १९६० नंतर मराठीत अनेक वाङ्मयप्रवाह निर्माण झाले. त्यांनाही संस्थांनी समाविष्ट करून घेतले पाहिजे. पूर्वी या संस्थांना राजाश्रय असल्याने त्या आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण नव्हत्या. सध्या त्यांना लोकाश्रय आहे. त्यात सरकारची मदतही अंतर्भूत आहेच; मात्र, त्यातही आपली प्रतिष्ठा कायम ठेवून मी मदत स्वीकारायला हवी. मराठीच्या जतनाचे आणि संवर्धनाचे काम केवळ साहित्य संस्था आणि मराठी प्राध्यापकांचे आहे, असे लोक मानतात. हे गृहीतक मोडून काढण्यासाठी संस्थांनी समाजातील उद्योजक, तंत्रज्ञ अशा इतर घटकांनाही समाविष्ट करून घेतले पाहिजे.''

समाज सधन होत असताना मराठी साहित्य संस्थांकडे मात्र तुटपुंजा निधी आहे, ही अस्वस्थ करणारी विसंगती आहे, अशी खंत व्यक्त करून ते म्हणाले, ''संस्थांनी केवळ वाङ्मयीन साक्षरता सांभाळायची असे नाही, तर बाहेरच्या क्षेत्रांशी दुवा साधण्याचे कामही केले पाहिजे. आजच्या विज्ञान युगातही साहित्य संस्थांना महत्त्व असून, ज्या समाजात अशी संस्था नाही, तो समाजच नाही.''

## * विज्ञानसाहित्याची समीक्षा होत नाही, हे दुर्दैव

''विज्ञान साहित्य सर्वाधिक वाचले जाणारे आहे; पण त्याची समीक्षा दुर्दैवाने

होत नाही, हा दोष समीक्षकांचा नाही. या साहित्याच्या समीक्षेची प्रमाणके सिद्ध झालेली नाहीत. हे साहित्य जसजशी नवी रूपे घेईल, तसतशी त्याची समीक्षा होत राहील,'' असे मत प्रसिद्ध समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शताब्दी महोत्सवाच्या शुभारंभ कार्यक्रमात 'स्वातंत्र्यानंतरच्या काळातील मराठी साहित्याचे बदलते संदर्भ' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. डॉ. रसाळ परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. द. ता. भोसले, प्रा. निशिकांत ठकार, श्रीनिवास भणगे, डॉ. बाळ फोंडके, डॉ. अरविंद संगमनेरकर यांनी परिसंवादात भाग घेतला.

डॉ. रसाळ म्हणाले, ''समाजात होणाऱ्या परिवर्तनाचे प्रतिबिंब वाङ्मयात तातडीने पडेलच असे नाही. वाङ्मयनिर्मितीची प्रक्रिया गुंतागुंतीची आहे. वैयक्तिक अनुभवाचे सामाजिकीकरण आणि अवैयक्तिकीकरण झाल्याशिवाय त्याचे वाङ्मयात रूपांतर होत नाही. एकीकडे वाङ्मयात उदासीनता दिसते, तर दुसरीकडे उत्साह, मानवी कर्तृत्वावर विश्वास दिसतो. दोन्ही प्रवाहांचा अप्रत्यक्ष संबंध राजकीय परिवर्तनाशी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आलेल्या प्रवाहांचे नाते आर्थिक, सामाजिक, राजकीय बदलांशी आहे. समीक्षकांनी त्याचा शोध घेतलेला नाही.''

मराठी कादंबरीबद्दल डॉ. भोसले म्हणाले, ''संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, शिक्षणाचा प्रसार, निवडणुका, राजकारण, वैज्ञानिक प्रगती, नामांतर चळवळी, भौतिक सुधारणा, १९७२ मध्ये पडलेला दुष्काळ, जातीय तेढ अशा विविध घटनांचा प्रभाव मराठी कादंबरीवर पडलेला दिसतो.''

मराठी कवितेबद्दल ठकार म्हणाले, ''कवितेचा काळ वर्तमानच नसतो. स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कवितेचा विचार करताना स्वातंत्र्यपूर्व काळातील कविताही लक्षात घ्यायला हवी. त्या काळातील कविता वसाहतकालीन होती. त्या कवितेने विराट जनआंदोलनाकडे पाठ फिरवली. १९६० नंतरच्या काळात प्रस्थापितांना हादरे देणारी, क्रांतिकारक स्थित्यंतर घडवणारी गतिशील कविता आली. नारायण सुर्वेंच्या रूपाने समाजसन्मुख कविता पुढे आली. या कवितांनी शोषितांचे आणि कामगारांचे जग समोर आले.''

मराठी नाटकाबद्दल बोलताना श्रीनिवास भणगे म्हणाले,''नाट्यलेखक हा वेगळ्या प्रकारचा लेखक आहे. नाट्यानुभव हा इतर अनुभवांपेक्षा वेगळा अनुभव आहे. त्याला सत्याभास म्हटले जाते. एका बाजूला तंत्र आणि दुसऱ्या बाजूला नाट्यविषय फुलविण्याचे कौशल्य, ही तारेवरची कसरत नाटककाराला करावी लागते, याची मराठी आस्वादकांनी खूणगाठ बांधावी. संगीत नाटक हा मानबिंदू होता; पण मराठी रंगभूमीने त्याचा अतिरेक केला. त्यामुळे रसिकांनी त्याकडे पाठ फिरवली. तेंडुलकरांसारख्या नाटककारांनी माणसाच्या अंतर्मनाचा शोध घेतला. ते एक प्रकारचे वस्त्रहरणच होते. त्याने प्रचंड धक्के बसले.''

डॉ. फोंडके विज्ञान साहित्याविषयी बोलताना म्हणाले, 'आयुष्यातील स्थित्यंतरांचा स्रोत वैज्ञानिक आविष्कारात असतो, याची जाणीव अनेकांना होत नाही. यापूर्वीच्या



काळात भा. रा. भागवत, द. पां. खांबेटे आदींनी विपुल लेखन केले. त्या वेळी अद्भुतकथा, परीकथा, बालसाहित्य म्हणून विज्ञानलेखनाची गणना झाली. विज्ञान साहित्य भविष्यदर्शी असते. आज अनेक बदल होत आहेत. त्याबाबत जागृती करण्याचे काम विज्ञान साहित्यच करणार आहे.''

डॉ. संगमनेरकर वैद्यकीय लिखाणाबाबत म्हणाले,''अशा पद्धतीचे लिखाण गरजेपोटी केले गेले. १९६० नंतर 'कन्सल्टंट'चे युग आले. १९७० नंतर 'स्पेशालिस्ट'चे आणि १९८०-८५ नंतर 'सुपर स्पेशालिटी'चे युग आले. माणसाचे आयुष्यमान वाढले, समस्या वाढल्या. 'फॅमिली डॉक्टर'चा दुवा राहिला नाही. त्यातून आरोग्यविषयक लिखाणाची सुरुवात झाली. गरजेनुसार या लिखाणाच्या पद्धती बदलल्या गेल्या. वैद्यकीय लिखाणामुळे डॉक्टर व रुग्ण यांच्यातील संबंध सुधारतील, वैद्यकीय व्यवसायातला भोंदूपणा, बाजारूपणा कमी होईल. मात्र, पुढच्या काळात वैद्यकीय विषयावर मराठीत किती लिहिले जाईल, एवढीच भीती आहे.''

### * हेमिंग्वे यांच्या 'अक्षरा'चे जतन

फेअरवेल टू आर्मस्, द सन ऑल्सो रायझेस, द स्नोज ऑफ किलिमांजारो अशा कादंबऱ्यांच्या माध्यमातून साहित्यक्षेत्रावर अमिट छाप टाकणारे प्रख्यात साहित्यिक अर्नेस्ट हेमिंग्वे यांचा हस्तलिखित स्वरूपातील लेखनाचा कच्चा मसुदा, पत्रे तसेच त्यांच्या रोजच्या वापरातील काही वस्तू यांचे योग्यरीत्या जतन करण्याचा संकल्प अमेरिका तसेच क्युबामधील त्यांच्या चाहत्यांनी सोडला आहे.

विविध देशांतील हेमिंग्वेप्रेमींची अनौपचारिक स्वरूपाची दहावी आंतरराष्ट्रीय परिषद नुकतीच हॅवाना येथे पार पडली. अमेरिका, क्युबासह फ्रान्स, इटली, ब्रिटन आदी देशांतील हेमिंग्वेप्रमीही त्यास उपस्थित होते. बोस्टन येथील प्रेसिडेन्शिअल म्युझियम अँड लायब्ररीकडे हेमिंग्वे यांनी लिहिलेले सुमारे साडेसात हजार कच्चे मसुदे, १४०० टिपणे तसेच जवळपास अडीच हजार पत्रे असा मोठा संग्रह आहे. त्याचे योग्य रीतीने जतन करण्यासाठी काय करता येईल, यावर या परिषदेत चर्चा झाली.

प्रत्यक्ष हेमिंग्वे यांच्या आवाजात रेकॉर्ड करण्यात आलेले त्यांच्याच लिखाणाचे उतारे, भाषणे असा बहुमोल ठेवा युएस रिसर्च सेंटरकडे आहे.

### * साहित्यिकांनी स्वत:च पैसे जमा करून संमेलने घ्यावीत

''शासनाच्या अनुदानातून संमेलने घेण्यापेक्षा साहित्यिकांनी स्वत:च पैसे जमा करून साहित्य संमेलने घ्यावीत,'' असे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांनी सुचविले.

डी. एस. कुलकर्णी फाऊंडेशनद्वारा आयोजित 'डीएसके गप्पा' या कार्यक्रमातील मुलाखतीत ते बोलत होते.

बालपणी भोगावे लागलेले कष्ट... शिक्षणाची ओढ...वाचण्याचे वेड..चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे आलेले अनुभव... रेल्वेतील पहिली नोकरी ते मराठी साहित्य

संमेलनाध्यक्ष... असा आपल्या आयुष्याचा अनेक टप्प्यांवरील प्रवास प्रा. मेश्राम यांनी या वेळी उपस्थितांसमोर उलगडला. अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी प्रा. मेश्राम यांची मुलाखत घेतली.

प्रा. मेश्राम म्हणाले, ''माझे बालपण खूपच कष्टात गेले. पैसे मिळविण्यासाठी कोळशाची व भुश्श्याची 'वॅगन' रिकामी केली, सायकल रिक्षा चालवली. मला आजोबांमुळे वाचनाचे वेड लागले. माझी भाषा वेगळी असल्याने मला इतरांशी बोलायची भीती वाटत होती. त्यामुळे बारा हजार पुस्तके वाचून काढली. कुटुंबासाठी कोणतीतरी नोकरी करणे गरजेचे असल्याने व प्रवासाचे मोफत पास मिळत असल्याने रेल्वेची नोकरी केली.''

''मोठ्या शाळेचे मास्तर व्हावे हे माझे चौथीपासूनचे स्वप्न होते,'' असे सांगून ते म्हणाले, ''रेल्वेच्या सेवेत असताना विद्वान व साहित्यिकांशी भेटीगाठी झाल्या, तेथूनच साहित्यातील प्रवासाचा श्रीगणेशा झाला. आत्मचरित्र न लिहिता ललित गद्यातून मला माझे अनुभव सांगणे आवडते.''

रसिकतेपेक्षा अहंकार जेव्हा मोठा होतो तेव्हा स्वतंत्र चूल तयार होते, असे सांगून प्रा. मेश्राम यांनी दलित साहित्य चळवळीत सुरू असलेल्या घटनांवर प्रकाश टाकला.

### * 'शंकरराव खरात यांचे पुण्यात स्मारक उभारावे'

साहित्यिक (कै.) शंकरराव खरात यांचे स्मारक शासनाने पुण्यात उभारावे, अशी मागणी 'शंकरराव खरात जयंती महोत्सव समिती'च्या बैठकीत करण्यात आली. साहित्यिक लक्ष्मण गायकवाड, रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष असीत गांगुर्डे, भारतीय रिपब्लिकन पक्ष-बहुजन महासंघाचे मुरलीधर जाधव, बाळ अल्हाट आदी या वेळी उपस्थित होते.

### * सात वर्षांच्या राधिका लाडच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन

वयाच्या सातव्या वर्षी कवितासंग्रह प्रकाशित होण्याचा मान राधिका लाड या मुलीला मिळाला. तिच्या 'ढगांची भरली शाळा' या कवितासंग्रहाचे प्रकाशन मधुसूदन घाणेकर यांच्या हस्ते झाले.

प्रसिद्ध गीतकार जयंत भिडे, बालसाहित्यकार अशोक दातार व साहित्यसृष्टीचे संपादक फुलचंद सांकला आदी उपस्थित होते. या प्रसंगी तन्मयी घाणेकर व राधिका लाड यांनी काही कवितांचे वाचन केले.

### * किसनमहाराज साखरे : चालते-बोलते विद्यापीठ

''लोककल्याणार्थ साधकाश्रमामार्फत विद्यादानाचे काम किसनमहाराज साखरे सध्या करीत आहे; त्यामुळे ते स्वत: एक चालते-बोलते विद्यापीठ आहेत,'' असे गौरवोद्गार टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांनी काढले.

या वेळी किसनमहाराज साखरे यांना टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने संतवाङ्मयाच्या अभ्यासात भरीव व मोलाची कामगिरी केल्याबद्दल सन्मानपर 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ही पदवी प्रदान करण्यात आली. अध्यक्षस्थानी डॉ. विजय



भटकर होते. माईर्स विश्वशांती केंद्राचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, श्रीकांत चितळे गुरुजी, बाबासाहेब लघाटे, अशोकशास्त्री कुलकर्णी या प्रसंगी उपस्थित होते.

डॉ. टिळक म्हणाले, ''समाजाला ज्ञान, अध्यात्माचा मार्ग महाराजांनी एकाच वेळी दाखविला. विद्यापीठ चालविताना आम्ही विद्यार्थ्यांना व्यवहारी ज्ञान देतो. केवळ व्यवहार आणि पैसे मिळविण्याचे मार्ग आम्ही दाखवितो; परंतु साखरेमहाराज यापुढील पायरी शिकविण्याचे काम करतात; संपूर्ण ज्ञानेश्वरी उलगडून दाखविण्याचे काम महाराजांनी केले; त्यामुळे त्यांना सन्मानपर पदवी देणे विद्यापीठाचे कर्तव्यच आहे.'' मानपत्राचे वाचन श्रीमती वझे यांनी केले. साखरेमहाराजांच्या 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' या पुस्तकाचे व 'स्वस्तिश्री' या मासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

### * ग्रंथालयांनी मदतीबाबत अर्ज करण्याचे आवाहन

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या योजनें अंतर्गत मदतीची आवश्यकता असल्यास राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी संबंधित विभागाचे सहायक ग्रंथालय संचालक यांच्या कार्यालयाकडे विहीत अर्जाची मागणी करून अर्ज प्राप्त करून घ्यावेत व १५ जुलैपर्यंत 'सहायक ग्रंथालय संचालक, पुणे विभाग, पुणे' यांच्या कार्यालयाकडे तीन प्रतींमध्ये प्रस्ताव पाठवावेत.

तसेच ज्या ग्रंथालयांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार मिळालेला नाही; ज्या ग्रंथालय कार्यकर्त्यांना व ग्रंथालय सेवकांना डॉ. एस. आर. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार मिळालेला नाही, अशांनीही आपल्या विभागाच्या ग्रंथालय संघाच्या शिफारशीसह ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण प्रस्ताव दोन प्रतींमध्ये पाठवावेत, असे आवाहन राज्याचे ग्रंथालय संचालक मो. भु. मेश्राम यांनी केले आहे.

### * इंग्लिश-मराठी डिक्शनरी

विचारप्रवर्तक प्रश्न, कोडी, गंमतीदार गोष्टी यांचा समावेश 'माय फर्स्ट इंग्लिश-मराठी डिक्शनरी'त करण्यात आला आहे. मुलांना पुन:पुन्हा पाहावीशी वाटेल, अशी तिची रचना करण्यात आल्याचे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळातील विशेषाधिकारी (इंग्रजी) धनवंती हर्डीकर यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या, ''शब्दकोशाच्या आधारे मुलांना कोणकोणते खेळ खेळता येतात, याची माहितीही देण्यात आली आहे. कोशातून शब्द लवकर शोधण्याची शर्यत, भेंड्या, एकाच उच्चाराच्या वेगवेगळ्या शब्दांचे स्पेलिंग सांगणे आदी अनेक खेळ मुलांना खेळता येतील.''

पहिली ते चौथीच्या इंग्रजी पुस्तकातील सगळे शब्द आणि नेहमी वापरले जाणारे आणखीही काही उपयुक्त शब्द असे एकूण दोन हजार शब्द या कोशात आहेत. ''प्राथमिक विद्यार्थी नजरेसमोर ठेवूनच हा कोश तयार करण्यात आला आहे. प्रत्येक शब्दाचा उच्चार, रूपे, अर्थ आणि त्यांचा वाक्यातील वापर या क्रमाने माहिती देण्यात आली आहे. व्याकरणविषयक विवेचन टाळण्यात आले

आहे; तसेच भारतीय वातावरणाचा विचार करूनच शब्दांचे वाक्यातील उपयोग मराठी भाषांतरासह दिले आहेत.'' प्रमोद शिरोडकर यांनी आठ महिन्यांत कोशाचे काम पूर्ण झाल्याचे सांगितले.

*** मराठी विश्वकोश मंडळ अध्यक्षांच्या प्रतीक्षेत**

डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या वाईच्या मराठी विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक ही दोन्ही पदे एका वर्षानंतरही रिक्त आहेत; त्यामुळे विश्वकोश निर्मितीचे कामकाज ठप्प झाले आहे.

वाईत १९६० पासून विश्वकोश निर्मितीचे काम चालू आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनानंतर प्रा.मे.पुं. रेगे व प्रा. रा. ग. जाधव यांनी या मंडळाच्या अध्यक्ष व संपादकपदाची धुरा काही काळ सांभाळली. या प्रकल्पात सुरवातीस वीस खंड प्रकाशित करण्यात येणार होते. त्यामध्ये सुधारणा करून नंतर विश्वकोश खंडांची संख्या २३ पर्यंत वाढविण्यात आली. यातील पहिले २० खंड शरीर (संहिता) खंड असून, बाकी तीन खंड अनुक्रमे 'परिभाषा संग्रह' नकाशा व 'सूची' खंड असे आहेत. यापैकी सोळा खंड प्रकाशित झाले आहेत. सतराव्या 'विज्ञान तत्त्वज्ञान ते शेक्सपिअर' या खंडाचे छापाईचे काम सुरू आहे. विश्वकोशाच्या अठरा ते वीस या खंडांचाही मजकूर तयार आहे.

प्रा. रा. ग. जाधव यांच्या राजीनाम्यानंतर एक ऑगस्ट २००३ रोजी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्यावर या मंडळाच्या अध्यक्ष व प्रमुख संपादकपदाची धुरा सोपविण्यात आली. त्यांनी विश्वकोश निर्मितीच्या कामाला गती देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनानंतर या मंडळाचे अध्यक्ष व प्रमुख संपादकपद ही दोन्ही पदे रिक्त आहेत.

*** ग्रंथशोध, ग्रंथसंग्रह हा धर्म**

''ग्रंथसंस्कृती आणि वाचनसंस्कृती यांना पैलू पाडण्याचे काम; तसेच त्यांना प्रकाशझोतात आणण्याचे काम अरुण टिकेकर यांच्या 'अक्षरनिष्ठांची मांदियाळी' या पुस्तकात दिसून येते. ग्रंथशोध, ग्रंथसंग्रह हा टिकेकरांचा धर्म आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रा. ग. जाधव यांनी केले.

साधना साहित्य मंचातर्फे 'सकाळ'चे संचालक-संपादक डॉ. अरुण टिकेकर यांनी लिहिलेल्या 'अक्षरनिष्ठांची मांदियाळी' या पुस्तकावर प्रा. जाधव यांनी विचार मांडले.

श्री. जाधव म्हणाले, ''वाचनसंस्कृतीचा मुक्त सेंद्रिय घटक म्हणजे 'ग्रंथसंस्कृती' असे मला वाटते; तथापि आजच्या काळात ग्रंथसंस्कृती काही प्रमाणात क्षीण झाली आहे. ही ग्रंथसंस्कृती या काळात पुन्हा विकसित कशी होणार, तसेच ग्रंथवाचक, ग्रंथवेडा, ग्रंथसंग्राहक कसा निर्माण होणार यासारखे मूलभूत प्रश्न हे पुस्तक वाचल्यावर वाचकाला अंतर्मुख करतात. लेखकाने अतिशय तल्लीनतेने आणि तन्मयतेने हे पुस्तक लिहिले आहे, हे जाणवते. त्यामुळेच हे पुस्तक मानवी नाते, मानवी भावभावना, मानवी मनाचा संघर्ष, आशा-निराशांचे खेळ हे



सर्व पदर उलगडून दाखवते.''

*** ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलन**

साहित्य-संस्कृतीच्या सर्व प्रवाहांना सामावून घेण्यास अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अपुरे पडत असल्याची जाहीर कबुली संमेलनाचे अध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांनी मुंबई येथे दिली.

विसाव्या ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. संमेलनाध्यक्षा डॉ. अनुपमा उजगरे यांच्यासह इतर मान्यवर या वेळी उपस्थित होते. ''वेगवेगळ्या वाङ्मयीन चळवळींना स्वत:चे अस्तित्व दाखवून देण्यासाठी छोट्या संमेलनांची गरज आहे. अशी संमेलनेच ठिणगीचे काम करू शकतात,'' असे सांगून प्रा. मेश्राम यांनी विविध साहित्य संमेलनांची आवश्यकता प्रतिपादित केली. माणसांचे विभाजन करण्यास राजकीय शक्ती एकत्र आल्या आहेत. पण त्यांना झुगारून देण्याची वेळ आली आहे, असे आवाहन त्यांनी केले.

स्वागताध्यक्ष विलास तोरणे यांनी स्वागत केले. संमेलनाला कवी मंगेश पाडगावकर, शंकर वैद्य यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते, नागपाडा नेबरहूड येथे हे संमेलन झाले.

*** शिवाजी सावंत कादंबरी पुरस्कार**

आजरा नगरीचे सुपुत्र, ख्यातनाम साहित्यिक शिवाजी सावंत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा. तर्फे 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत कादंबरी पुरस्कार देण्यात येतो. गतवर्षीचा पुरस्कार सौ. सुरेखा शहा (सोलापूर) यांच्या 'जोहड' या कादंबरीला देण्यात आला होता. सदर पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व रोख १००१ रुपये असे आहे. शिवाजी सावंत स्मृतिदिनानिमित्त होणाऱ्या समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

यावर्षीच्या पुरस्काराकरीता लेखक/प्रकाशकांनी दिनांक १/१/२००३ ते ३०/९/२००४ पर्यंत प्रकाशित झालेल्या कादंबरीची एक प्रत अध्यक्ष, श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर ४१६ ५०५ यांचेकडे दि. १५ ऑगस्ट २००५ पर्यंत पाठवावी.

*** 'वॉटरगेट'प्रकरण 'डीप थ्रोट'वर पुस्तक!**

अमेरिकेचे माजी अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांना ज्यामुळे राजीनामा द्यावा लागला ते बहुचर्चित 'वॉटरगेट' प्रकरण उघडकीस आणणारे 'द वॉशिंग्टन पोस्ट'चे प्रतिनिधी बॉब वूडवर्ड यांचेच मुख्य सोर्स डीप थ्रोट याच्यावर प्रकाशझोत टाकणारे पुस्तक प्रसिद्ध होत आहे.

वॉशिंग्टन पोस्टने आपल्या 'व्हॅनिटी फेअर' मासिकात 'डीप थ्रोट'नावाने गोपनीय माहिती पुरविणारे मुख्य सोर्स मार्क फेल्ट यांची ओळख जाहीर करून खळबळ उडवून दिल्याने 'वॉटरगेट' प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

प्रकाशक 'सिमॉन ॲण्ड शुस्टर'चे कार्यकारी उपाध्यक्ष डेव्हिड रोझेंथल यांनी सांगितले, 'द सीक्रेट मॅन : द स्टोरी ऑफ वॉटरगेट्स डीप थ्रोट' नावाने हे पुस्तक प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संपूर्ण वॉटरगेट प्रकरणाचा पंचनामा करणाऱ्या या पुस्तकात वूडवर्ड यांनी 'डीप थ्रोट' म्हणजेच एफबीआयचे माजी अधिकारी मार्क फेल्ट यांना कसे गाठले, त्यांच्याकडून माहिती कशी काढली, तसेच वार्तांकनात माहितीचे विश्लेषण कशा पद्धतीने केले, अशा सर्व पैलूंचा लेखाजोखा असणार आहे. सध्या आजाराने त्रस्त असलेल्या ९१ वर्षीय मार्क फेल्ट यांच्या निधनानंतर पुस्तक प्रसिद्ध करण्याचा वूडवर्ड यांचा मानस होता; परंतु व्हॅनिटी फेअरमध्ये फेल्ट यांचे नाव उघड झाल्याने जुलै महिन्यातच पुस्तक प्रसिद्ध करण्यात येत आहे.

### * कर्तृत्ववान मराठी माणसांची सूची

ग्रंथालीतर्फे स्थापन करण्यात आलेल्या मराठी विद्यापीठातर्फे जगभरातील विचारी आणि संवेदनशील मराठी मंडळींना एकत्र जोडण्यासाठी आणि त्यांच्यातील ज्ञानाचे व कार्यानुभवाचे आदानप्रदान वाढविण्यासाठी विविध क्षेत्रांतील प्रसिद्ध आणि अप्रसिद्ध मराठी व्यक्तींची माहिती संकलित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

ही माहिती त्रिस्तरीय असेल. पंचतारांकित व्यक्तिमत्त्व या गटात त्या त्या क्षेत्रांत उच्च स्थान मिळविलेल्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या मराठी माणसांचा समावेश असणार आहे.

जगभरात काही मराठी माणसे आपापल्या क्षेत्रात उत्तम काम करत असून त्यांचे हे क्षेत्र प्रसिद्ध किंवा ग्लॅमरस नसल्याने ही मंडळी प्रसिद्धीपासून दूर आहेत. त्यांचे काम समाजापुढे यावे यासाठीही प्रयत्न करण्यात येणार आहे. स्थानिक आणि जिल्हा पातळीवरही राजकारण, शिक्षण, समाजकारण, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांतही अनेक जणांचे महत्त्वपूर्ण योगदान असते. त्याचीही दखल तिसऱ्या गटात घेण्यात येणार आहे.

पंचतारांकित व्यक्तिमत्त्व असलेल्या गटातील माणसांबद्दल माहिती सहजपणे मिळू शकते. मात्र दुसऱ्या आणि तिसऱ्या गटातील माहिती सहजपणे उपलब्ध नसल्याने या दोन गटांतील कर्तबगार मराठी व्यक्तींची नावे आणि माहिती पाठवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पत्ता - मराठी विद्यापीठ, द्वारा ग्रंथाली, महापालिका शाळा इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर पोलीस ठाण्यासमोर, ग्रॅन्ट रोड, मुंबई ४००००७ marathividyappeth@rediffmail.com, granthali01@rediffmail.com तसेच granthali01@yahoo.com अधिक माहितीसाठी-२३८७५४८१

### * मराठी ई पुस्तके सातासमुद्रापारही जाणार

उत्तम पुष्प या प्रकाशन संस्थेने 'ई-बुक तंत्रज्ञानाने मराठी पुस्तके प्रकाशित



करून ती सातासमुद्रापार नेण्याचे ठरवले आहे. भारताबाहेर राहणाऱ्या मराठीजनांकडून मराठीतील दर्जेदार पुस्तकांना चांगली मागणी येते. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाने इंटरनेटवरून डाऊनलोड करता येणारी 'ई-बुक' सिस्टिम सोयीची आहे. वाचनाची भूक भागवण्यासाठी 'ई-बुक' प्रकल्प भारताबाहेरील मराठी माणसाच्या दुसऱ्या पिढीला डोळ्यासमोर ठेवून आखला आहे.

मराठी भाषा, संस्कृत व कलांना पाठबळ देण्यासाठी www.imarathi.com या नावाने वेबसाईट विकसित केली जात आहे.

या वेबसाईटवरून मराठी पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मराठी साहित्यविश्व, कला, नाट्य-चित्र क्षेत्रासाठी अनेक उपयुक्त गोष्टींचा समावेश असणार आहे.

### * 'स्पर्धांमधून येतील नवे कवी जन्माला'

काव्य लिहू इच्छिणाऱ्या वाङ्मयप्रेमींसाठी काव्यपूर्ती स्पर्धा फायदेशीर असून अशा स्पर्धांमधून काही उत्तम कवी पुढे येतील, असे मत ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांनी व्यक्त केले.

साहित्य संघ पुणे दक्षिणतर्फे आयोजित करण्यात आलेल्या काव्यपूर्ती स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभास ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. काव्यपूर्ती स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक माधुरी जोशी यांना, द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार वसुंधरा पुणतांबेकर यांना आणि तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक सरोज लागू यांना देण्यात आले. सौ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.

### * डॉ. ग. वा. करंदीकर यांचा सत्कार

ज्ञानवर्धिनीचे संस्थापक डॉ. ग. वा. करंदीकर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखक व विचारवंत डॉ. नि. ना. रेळेकर होते. भगवान शंकराच्या जटेमधून गंगेचा उगम व्हावा, त्याप्रमाणे ज्ञानवर्धिनी संस्था डॉ. करंदीकर यांच्या हृदयातून उगम पावली आणि त्यांनी पुसद येथील अनेक दलित, आदिवासी व तांड्यांतील अनेकांचे जीवन घडविले, या शब्दांत त्यांचा गौरव करण्यात आला.

### * स्पेलिंगच्या स्पर्धेत १२ भारतीय विद्यार्थी

अमेरिकेतील अनिवासी भारतीयांची बारा मुले तेथील ७८व्या स्क्रीप्स राष्ट्रीय 'स्पेलिंग बी' स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचली आहेत. त्यात अश्विनी गोखले या मराठी मुलीचाही समावेश आहे.

अमेरिकेतील नऊ ते चौदा वयोगटातील शेकडो विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेतात. एक लेखी परीक्षा आणि त्यानंतरच्या तीन गोंधळात टाकणाऱ्या फेऱ्या यातून तावून सुलाखून निघालेले स्पर्धकच येथे पोहोचू शकतात. या मुलांना आधी आपल्या शाळेत पहिले यावे लागते, नंतर राज्यात आणि पुढे विभागीय

स्पर्धेत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकावे लागते.

बारा भारतीयांमध्ये इलिऑनौसमधून अश्विनी गोखले आणि बॉनी जैन, कॅलिफोर्नियातून अनुराग कश्यप आणि अलिया डेरी, कोलोरॅडोहून मैत्रेयीगोपालकृष्णन, मॅसेश्युसेट्समधून साहिती सुरापाणेनी, ओहियोमधून सप्तर्षी चौधरी तसेच टेक्सासमधून निखिल कोगंटी, समीर पटेल आणि निधर्शन आनंदशिवम यांचा समावेश आहे. या प्रत्येकाला किमान पन्नास डॉलर मिळणार आहेत.

अमेरिकेतील भारतीयांनी या स्पर्धेत नेहमीच आपला वरचष्मा कायम राखलेला आहे. १९८५ साली बालू नटराज पहिली भारतीय 'अमेरिकन चॅम्पियन' ठरली होती. त्यानंतर ८८ ला रागेश्री रामचंद्रन, ९९ ला नुपूर लाला, २००० ला जॉर्ज थम्पी, २००२ ला प्रत्युष बुड्डीगा आणि २००३ साली साई गुंटुरी ही भारतीय वंशाची मुले स्पर्धेत विजयी ठरली होती.

स्पर्धेतील चॅम्पियनला २८ हजार डॉलर रोख शिवाय दहा हजारांच्या शिष्यवृत्त्या आणि ब्रिटानिका एनसायक्लोपेडियाची प्रत यांचा लाभ होतो. कदाचित त्यांना अध्यक्ष जॉर्ज बुश यांना भेटण्याची संधीही मिळू शकेल.

*** धोतर नेसलेला स्पायडरमॅन**

धोतर नेसलेल्या देशी अवतारातला कॉमिक्स स्पायडरमॅन अमेरिकेत धुमाकूळ घालत आहे आणि हा धोतरातला स्पायडरमॅन भारतातही येऊ घातलाय.

देशी स्पायडरमॅनच्या कहाणीत सगळेच देशी आहे. त्यात एक योगी आहे. राक्षस आहे. मुंबई आणि ताज महलही आहे. विलायती स्पायडरमॅनचे खरे नाव पीटर पार्कर. आपल्याकडे त्याचे बारसे **पवित्र प्रभाकर** असे झाले आहे. मूळ गोष्टीतली त्याची मैत्रीण मेरी जेन भारतात येऊन **मीरा जैन** झाली आहे, तर अंकल बेनचा अंकल भीम झाला आहे. त्यातल्या इंग्रजीलाही खास मुंबई टच आहे. भारत हा असा देश आहे की तेथे सुपरहिरो अवतरणे सर्वाधिक शक्य आहे, अशी धारणा असलेल्या जीवा कांग या कलाकाराने स्पायडरमॅनचा भारतीय अवतार घडवून आणला आहे. त्यामुळे त्यात एक योगी आहे, तो आयुष्याला विटलेल्या पवित्र प्रभाकरला भेटतो आणि त्याला लोंबकळण्याची सिद्धी देतो. योगी सांगतो की तू हे आव्हान स्वीकार कारण अन्यायाचा प्रतिकार हेच तुझे 'कर्मा' आहे. त्यानंतर हा देशी कोळीदादा रिक्षा आणि स्कूटरने गजबजलेल्या मुंबापुरीवरून उडत उडत महापापी राक्षसांचा नि:पात करतो, अशी देशी थीम आहे.

❒

चिंगीच्या कोड्याचं उत्तर
मावस पणजी




जाहिरात

जाहिरात



## पुस्तक परिचय




# मंत्र श्रीमंतीचा

**खरोखर तुम्हाला श्रीमंत व्हावे असे मनापासून वाटतेय्? तर मग हे पुस्तक वाचायलाच हवे**

**श्याम भुर्के**

बँकेतील नोकरीमुळे कर्मचाऱ्यांना काय काय लाभ होतात या प्रश्नाला अनेक उत्तरे मिळू शकतील; परंतु श्याम भुर्के यांना बँकेतील नोकरीमुळे श्रीमंत अधिक श्रीमंत कसे होतात हे पहायला मिळाले; तसेच अनेक मध्यमवर्गीय हे हुशार असूनही मागे का राहिले हेही बघायला मिळाले; आणि आपल्याला मिळालेले हे सर्व ज्ञान सर्वसामान्यांना सांगून त्यांनाही युक्तीच्या या चार गोष्टी सांगून शहाणे आणि शक्यतर श्रीमंत बनविण्याचा विचार त्यांच्या मनात आला. परंतु लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण असे कोणी म्हणू नये, त्यांनी श्रीमंत होण्याचा मंत्र स्पष्ट करण्यासाठी कादंबरी ह्या वाङ्मय प्रकाराचा वरकरणी वापर करून उदाहरणाद्वारे नियम सिद्ध करण्याचा आणि ते प्रभावीपणे वाचकाच्या मनावर बिंबवण्याचा मार्ग अनुसरून 'मंत्र श्रीमंतीचा' हे पुस्तक लिहिले.

एका व्यक्तिमत्त्व शिबिरात दहावी शिकणारा पंधरा वर्षे वयाचा मनोहर विद्याधर बुद्धिवंत हा मुलगा लक्ष्मीकांत धनेश्वर यांचे भाषण ऐकतो आणि त्यांच्या भाषणातील काही मुद्दे ऐकून चक्रावून जातो.

**''तुमच्या शिक्षणामुळे तुम्ही मोठे व्हाल अशी खात्री नाही.''**

**''आजचे शिक्षण कारकून बनवणारे आहे. तिकडे फार लक्ष देऊ नका.''**

**''जगातली बहुसंख्य मोठी माणसे शाळेत किंवा कॉलेजात अभ्यासात फारशी चमकली नाहीत.''**

**''सध्याच्या शिक्षण पद्धतीत जगाला सामोरे जाण्याचे शिक्षण मिळत नाही.''**

**''जगातील श्रीमंत माणसे शिक्षणामुळे श्रीमंत झाली असे नाही.''**

शालेय शिक्षणापेक्षा पैसे मिळवायचं व्यवहारज्ञान शिकण्यावर भर द्या असा त्या व्याख्यानाचा एकूण सूर होता आणि तो मनोहरला आकर्षक वाटला. आपण श्रीमंत व्हायचे असेही तो मनोमन ठरवतो.

शिबिर संपल्यावर तो शिबिरातील गमतीजमती सांगताना धनेश्वर यांच्या भाषणातील हे विचारही आपल्या वडिलांना ऐकवतो. तेव्हा वडील म्हणतात, ''तुझे हे धनेश्वरकाका आणि मी एकाच शाळेत शिकायला होतो. तो अभ्यासात बेताचाच होता. जेमतेम पास व्हायचा...माझा नेहमी पहिला नंबर असायचा. एम. ए.ला पहिला आलो. प्रोफेसर झालो... धनेश्वरनं इनव्हेस्टमेंट कंपनी काढली. जमिनीच्या खरेदीविक्रीत खूप पैसा मिळवला. पुण्यात त्याचा मोठा बंगला आहे. त्याचे वडील श्रीमंत नव्हते; पण त्याने स्वत:च्या कष्टाने आणि हुशारीने प्रचंड कमाई केली.''

धनेश्वरकाका अभ्यासात हुशार नव्हते तर एवढे श्रीमंत कसे झाले? असा प्रश्न मनोहरला पडतो. आणि त्याचे उत्तर मिळवण्यासाठी तो धनेश्वरकाकांना भेटायला जातो... त्यांना सांगतो, ''तुमचं भाषण ऐकल्यापासून आपणही श्रीमंत व्हावं असं मी मनाशी ठरवलंय... तर त्यासाठी मी काय करायला हवं?''

''तुझे हे धनेश्वरकाका आणि मी एकाच शाळेत शिकायला होतो. तो अभ्यासात बेताचाच होता. जेमतेम पास व्हायचा...माझा नेहमी पहिला नंबर असायचा. एम. ए.ला पहिला आलो. प्रोफेसर झालो... धनेश्वरनं इनव्हेस्टमेंट कंपनी काढली.

धनेश्वरकाका त्याला विचारतात, ''श्रीमंत व्हावं असं तुझ्या मनात कधी आलं?''

''तुमचं भाषण ऐकलं तेव्हा... पण त्यानंतर एक प्रसंग घडला; आणि आपण श्रीमंत व्हायचंच असा मी निश्चय केला.''

तो प्रसंग असतो लोणावळा ट्रिपच्या वेळी व्हॅनमध्ये आपल्याला वगळले गेल्यामुळे झालेल्या अपमानाचा.... त्यावेळी मनोहरला जाणवते, या जगात गरिबाची अवहेलना होते, पैशाला किंमत आहे... श्रीमंतीला मान आहे... आपणही एक दिवस कार घ्यायची...

धनेश्वरकाका त्याला सांगतात, ''तू दहावीला आहेस. मेरिटमध्ये येण्याच्या खटपटीला लागलास तर कमाई करता येणार नाही. वरच्या मार्कांच्या मागे लागण्यापेक्षा काही पैसे कमावून दाखव... हा माझा पहिला धडा. मी सांगितलेला गृहपाठ पूर्ण कर... मग पुढचा धडा...''

अभ्यास आणि कमाई - दोन्ही आघाड्यांवर लढायचं मनोहर ठरवतो

- आणि मनोहर कमाईसाठी काय करता येईल हे शोधू लागतो. तेथून त्याच्या



श्रीमंतीचा प्रवास सुरू होतो.

आपल्याजवळ विकण्यासारखं काय आहे?

लोकांना काय हवे आहे?

लोक त्यासाठी किती किंमत द्यायला तयार आहेत?

लोकांना आपण योग्य किंमतीला योग्य ती वस्तू देऊ शकतो का?

आपल्याजवळ विकण्यासारखे काही आहे हे लोकांना कसे कळवायचे?

असे विचार मनोहरच्या मनात येऊ लागतात. तो आजूबाजूला पाहू लागतो. किराणा दुकान... दुकानांच्या शोरुम्स... त्यातील माल... वृत्तपत्रातल्या जाहिराती... विद्यार्थ्यांसाठी क्लासेस...

आपण दहावीत आहोत... नववी पास. आपण नववीपर्यंतच्या मुलांचा क्लास घेऊ शकतो... मग फ्लॅटवर तो पुठ्ठ्याचा बोर्ड लावतो. **प्रकाश क्लासेस** आठवीनववीचे वर्ग घेतले जातील... मुले येत नाहीत. फ्लॅट फ्लॅट मध्ये जाऊन तो माहिती देतो... ट्युशनचे विद्यार्थी मिळण्याऐवजी त्याची कुठे टिंगल होते, कुठे त्यालाच उपदेशाचे डोस पाजले जातात. दहावीचा विद्यार्थी... आधी दहावी तर हो... असा सल्ला मिळतो.

'व्हेरी गुड. तू मोठा होशील. श्रीमंतही होशील. ज्याला काही विकायचे कसे हे कळते तो मोठा होणारच. माल असो वा सेवा असो, विकता यायला हवी. विक्री करण्याची ही कला जगाला सामोरे जाण्याचे शिक्षण देते...''

ट्युशन मिळत नाही... थोडी निराशा होते.

परंतु दिवाळी जवळ आल्यावर फटाक्यांचे दुकान दिसते. आपण फटाके विकले तर? तो दुकानदाराकडे काम करतो... नंतर फटाक्यांचे नमुने घेऊन घरोघर जाऊन ऑर्डर्स मिळवतो. नमुन्याचा माल रोखीने विकून... नवीन माल घेऊन विकतो... बारा हजार रुपयांची विक्री... अठराशे रुपये फायदा...

मनोहर श्रीमंतीच्या मार्गातली पहिली पावले टाकू लागतो.

स्वकष्टाईने कमाई केल्यावर भेट असे धनेश्वरकाकांनी सांगितलेले असते. तो भेटीसाठी वेळ मागतो. धनेश्वरकाका त्याचे अभिनंदन करतात. 'व्हेरी गुड. तू मोठा होशील. श्रीमंतही होशील. ज्याला काही विकायचे कसे हे कळते तो मोठा होणारच. माल असो वा सेवा असो, विकता यायला हवी. विक्री करण्याची ही कला जगाला सामोरे जाण्याचे शिक्षण देते...''

ते त्याला व्यवसायातला पुढचा धडा देतात.

''फटाकेविक्री करून तू कमिशन मिळवले... पण तुझ्याजवळ फटाके विक्रीचे लायसन्स आहे का?... जो धंदा करायचा त्याची कायदेशीर बाजू समजावून घ्यायला हवी...व्यवहार नीट झाला तर अडचण नाही. पण कायद्याचं ज्ञान हवं. बेकायदेशीर काही करायचं नाही...''

अशा टिप्स देतानाच धनेश्वर नोकरदाराचे उत्पन्न आणि श्रीमंतांचे उद्योगधंद्यातील उत्पन्न याच्यातील फरक स्पष्ट करून दाखवतात. ''पगारदाराचा पैसा कर भरण्यासाठी, कर्ज फेडण्यासाठी व दैनंदिन गरजांसाठी कामी येतो तर श्रीमंतांचा पैसा अधिक उत्पन्नासाठी गुंतवला जातो. नोकरदार पैशासाठीच काम करतो पण श्रीमंत कधीही पैशासाठी काम करीत नाही; उलट पैसाच त्याच्यासाठी काम करतो. श्रीमंतांकडील प्रत्येक खर्च त्यांचा उत्पन्नकर वाचवत असतो; नोकरदार ऑफिसला गेला तरच पगार मिळतो; श्रीमंताला त्याची गुंतवणूक नफा देत राहते.'' यासारखी त्यांची निरीक्षणे वास्तवाचे एक वेगळेच भान देतात.

''पगारदाराचा पैसा कर भरण्यासाठी, कर्ज फेडण्यासाठी व दैनंदिन गरजांसाठी कामी येतो तर श्रीमंतांचा पैसा अधिक उत्पन्नासाठी गुंतवला जातो. नोकरदार पैशासाठीच काम करतो

श्याम भुर्के यांनी याच धर्तीवर मनोहरला उत्पन्नाचे वेगवेगळे मार्ग, आणि त्यातील खाचाखोचा जाणून पैसा मिळवण्याच्या संधी वापरणे यावर प्रकाश टाकला आहे.

शिक्षण चालू ठेवून मनोहर श्रीमंतीचे एकेक सूत्र आत्मसात करीत जातो आणि आपल्या उत्पन्नात भर घालत राहतो. मिळालेले पैसे योग्य प्रकारे गुंतवून त्यावरही पैसा मिळवण्याची दक्षता घेणे आवश्यक असते; हेही धनेश्वर लक्षात आणून देतात.

दहावीत सत्तर टक्के गुण मिळवून तो पास होतो. पण त्याबरोबर स्वत: कमाई करण्याचे तंत्रही तो हस्तगत करून, अकरावीला कॉमर्स घेण्याचे ठरवतो. व्यवसायासाठी जमाखर्च, हिशेब, व्यवस्थापन वगैरे विषयांचे ज्ञान हवेच.

एकदा व्यवसायाची दृष्टी आली की आपल्याला कमाईची संधी कुठे आहे हे सहजपणे ध्यानात येऊ लागते.

कॉलेजातील वस्तू भांडारातून वह्या वगैरे घेण्यासाठी मुलांची गर्दी होते. मोठी रांग लागते. मनोहर मी विक्रीसाठी मदत करू का विचारतो. प्राचार्यांना भेटून परवानगी घेतो. रोज संध्याकाळी दोन तास काम करण्याचे आश्वासन देतो... गोडाऊनवजा स्टेशनरी दुकानाची सुरेख पुनर्रचना करतो... इतर वस्तूही विक्रीला ठेवून विक्री वाढवतो... प्राचार्यांना स्टेशनरी शॉपचा जुना बोर्ड बदलून नवा आकर्षक



बोर्ड व नवे नाव ठेवण्याची कल्पना पटवतो... नावासाठी मुलांची स्पर्धा लावतो... स्पर्धेची पोस्टर्स सगळीकडे लावतो. नावाच्या चिठ्ठ्यांसाठी जागोजाग बॉक्सेस ठेवतो... 'हार्मनी' हे नवे नाव... नवनव्या वस्तूंचा दुकानात समावेश... विक्री वाढते. नफा वाढतो.

...दिवाळी येताच गेल्या वर्षीचा फटाक्यांचा व्यापारी मनोहरचा शोध घेत त्याच्या घरी येतो... तुला हवा तेवढा माल क्रेडिटवर देतो असे सांगतो... लायसेन्सच्या बाबतीत 'तुला नमुना म्हणून माल देत आहे' असे पत्र देऊन कायद्याचे पालन होईल असा मार्ग काढतो-

... धनेश्वरकाकांच्या तालमीत असे धडे गिरवत, मनोहरची जडणघडण होत जाते. गुणवत्ता हा आपला स्वभाव झाला पाहिजे. सचोटी पाहिजे. स्पर्धेच्या युगात हातोटी हवी. व्यवसायाचं पूर्ण ज्ञान हवं... व्यवसाय चालायलाच हवा... प्रत्येकाला काही ना काही विकता यायला पाहिजे हे महत्त्वाचे... त्याचप्रमाणे लिखोटी हवी... खरेदी, विक्री, उधारी, शिल्लक, नफा, येणी देणी... घरखर्च नफ्यातून करायचा; विक्रीच्या पैशातून नव्हे. विक्रीचे पैसे पुढील मालखरेदीसाठीच वापरायला हवे... यशस्वी धंद्यासाठी हे सर्व आवश्यक...''

गुणवत्ता हा आपला स्वभाव झाला पाहिजे. सचोटी पाहिजे. स्पर्धेच्या युगात हातोटी हवी. व्यवसायाचं पूर्ण ज्ञान हवं... व्यवसाय चालायलाच हवा... प्रत्येकाला काही ना काही विकता यायला पाहिजे हे महत्त्वाचे... त्याचप्रमाणे लिखोटी हवी...

बारावीत ७६ टक्के गुण मिळवून मनोहर पास होतो. कॉलेज ॲडमिशनला अडचण नसते...

यूथ हॉस्टेलतर्फे हिमालय ट्रेकिंगची जाहिरात मनोहर वाचतो. पंधरा दिवस. पंधरा हजार खर्च... मनोहर त्या ट्रेकला जायचे ठरवतो. चौकशी करतो. ग्रुप बुकिंगला प्रत्येकी हजार रुपये सवलत... मनोहर पंचवीस सदस्य मिळवतो... त्याच्या ट्रेकचा खर्च परस्पर निघतो... बुकिंग एजन्सी सुरू करतो...

...बी कॉमच्या शेवटच्या वर्षात ५० टक्के गुण मिळवून यशस्वी होतो. धनेश्वरकाका त्याला १५ हजार दरमहा पगाराची मॅनेजरची नोकरी ऑफर करतात. तो त्यांना म्हणतो, नोकरीच्या स्कूटररेसमधे अडकू नका असे तुम्ही सांगत होता... मी नोकरी नाही, स्वतंत्र व्यवसायच करणार... तुम्ही आर्थिक क्षेत्रात माझे गुरू आहात... ही ऑफर नाकारली म्हणून रागावू नका... तुमचा सल्ला मला मिळत राह्यला हवा...'' त्या क्षणी त्याच्या खात्यावर बँकेत दोन लाख रुपये असतात. पाच वर्षातील त्याच्या कमाईचे...

शेअर मार्केटमधील गुंतवणूक, जमिनीचे व्यवहार, यातही पुढे मनोहर रस घेतो... जगात सर्वात शक्तिमान संपत्ती म्हणजे आपले मन. त्यासाठी शिक्षण हवे... आपला प्रत्येक रुपया पुढील रुपया कमवत राह्यला हवा... स्वत:ची इन्व्हेस्टमेंट कन्सल्टन्सी तो सुरू करतो. उद्घाटनाच्या समारंभात धनेश्वरकाकांचे भाषण ठेवतो... 'गुंतवणूक कशी करावी?'...

एका बँकेची थकबाकीपोटी एका बंगल्याच्या लिलावाची जाहिरात येते. मनोहर लिलावात भाग घेतो... त्या व्यवहारात तेरा लाख रुपयांचा लाभ होतो.

श्याम भुर्के कमाईचे वेगवेगळे मार्ग उघड करतात.

मल्टिलेव्हल मार्केटिंगने (जपानी गादी इ.) मध्यंतरी धुमाकूळ घातला होता. त्यामधील धोकेही ते दाखवतात. यशस्वी उद्योजकांच्या कहाण्याही सांगतात. शंकेखोर हा गरीबच राहतो असेही स्पष्ट सांगतात.

पैशाशिवाय जगात काहीही चालत नाही.

पैशापेक्षा पैसा कमविण्याची कला श्रेष्ठ.

येणारा पैसा पुढील पैसा मिळवत राहील, असा गुंतवा.

संपत्ती आणि देणी यांच्यातील फरक ओळखायला शिका.

> पैशाशिवाय जगात काहीही चालत नाही. पैशापेक्षा पैसा कमविण्याची कला श्रेष्ठ. येणारा पैसा पुढील पैसा मिळवत राहील, असा गुंतवा. संपत्ती आणि देणी यांच्यातील फरक ओळखायला शिका.

धनेश्वरकाका मनोहरला शेवटी सांगतात. "आज तू माझ्यापेक्षाही श्रीमंत झालायस. तुला गुरुदक्षिणा द्यायचीच असेल तर या महाराष्ट्रात असे अनेक श्रीमंत निर्माण कर."

'मंत्र श्रीमंतीचा' हे पुस्तक असे प्रेरणा देणारे आहे. मनोहर या तरुणाच्या मनात श्रीमंतीबद्दल ओढ निर्माण होणे आणि पैसा मिळवण्यासाठी विविध मार्ग त्याने चोखाळत राहून अर्थार्जनाचे भक्कम नेटवर्क उभारण्यात त्याला यश लाभणे हा सगळा प्रवास या पुस्तकात श्याम भुर्के यांनी दाखवला आहे.

श्रीमंत कसे व्हावे याविषयी मार्गदर्शन करणारे हे पुस्तक मनोहर आणि धनेश्वरकाका यांच्या परस्परचर्चांमुळे नाट्यपूर्ण आणि वाचनीय झाले आहे.

आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या विशिष्ट ज्ञानक्षेत्रातील अध्ययनाबरोबर उद्योजकतेचेही अनौपचारिक धडे घ्यावेत, प्रयोग करावेत आणि सैद्धांतिक ज्ञानाला अनुभवाची जोड द्यावी या दृष्टीने या पुस्तकाचा प्रभाव पडल्याशिवाय राहणार नाही.

**पृष्ठे : १९५ ● किंमत : १३० रु. ● सभासदांना : ९८रु. ● पोस्टेज : २०रु.**




दैनंदिन जीवनात हरघडी उपयोगी पडणारी
विविध विषयांवरील सर्वांगसुंदर पुस्तके

## चला जाणून घेऊ या!




| | | | |
|---|---|---|---|
| सुख | विकास मलकानी | अनु. शुभदा गोगटे | ३०रु. |
| तणाव व राग | विकास मलकानी | अनु. शुभदा गोगटे | ३०रु. |
| तंदुरुस्ती | विजया कुमार | अनु. मोतिया बसर्गेकर | ३०रु. |
| रेकी | सुमीत शर्मा | अनु. शुभदा गोगटे | ३०रु. |
| फेंग शुई | विजया कुमार | अनु. शुभदा गोगटे | ३०रु. |
| चालणे | विजया कुमार | अनु. मोतिया बसर्गेकर | ३०रु. |
| अंकशास्त्र | विजया कुमार | अनु. गंगाधर महाम्बरे | ३०रु. |
| वास्तुशास्त्र | विजया कुमार | अनु. स्वाती शहा | ३०रु. |
| यशाचं रहस्य | जेम्स ॲलेन | अनु. सुभाष जोशी | ३०रु. |
| स्मरणशक्ती कशी वाढवावी? | महेश कापडिया | अनु. शुभदा गोगटे | २५रु. |
| प्रथमोपचार | डॉ. सावित्री रमैया | अनु. महेस कश्यप | २५रु. |
| योगविद्या | ललिता शर्मा | अनु. मंगेश कश्यप | २५रु. |





# संभाजी

## लेखकाच्या नजरेतून....

विश्वास पाटील

*बलाढ्य औरंगजेबाच्या पाच लाख माणसांना आणि चार लाख जनावरांना ज्याने आठ वर्षे रोखून धरले. सह्याद्रीच्या पर्वतरांगांना पाठीपोटाशी बांधून ज्याने वैऱ्याशी कडवी झुंज दिली. ज्याच्या तडाख्याने पोर्तुगीजांना आपली पणजी येथील राजधानी सोडून मायदेशी परतायची तयारी करावी लागली. ज्याने प्रभु रामचंद्र आणि अलेक्झांडरसारखा जंजिऱ्याच्या दर्यात सेतू बांधला. अरब सेनानी मदतीस घेतले. इंग्रजांना आपल्या वखारीत चूप बसायला भाग पाडले. कुडाळ आणि डिचोलीला बारुदांचे नवे कारखाने सुरू केले. तारापूरपासून डिचोलीपर्यंत पश्चिम किनाऱ्यावर दर्याचे पाणी पेटवले. मात्र शाहिरांनी क्वचितच त्याच्यावर पोवाडे रचले.*

*ज्याने इंग्रजांना गुलामगिरीवर बंदी घालायला भाग पाडले. शेतीसाठी प्रथम नद्यांचे पाट बदलायची कल्पना राबवली. स्वत: रणावर राहून आपल्या महाराणीच्या हातात कारभार सोपवून स्त्रीजातीला राज्यकारभारात गौरवाचे स्थान दिले.*

*महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वात दीर्घकाळ रणावरची आग सोसणारा तो मर्दमराठा! ज्याने औरंगजेबाला त्याच्या बिन्नीच्या तीस सरदारांसह महाराष्ट्र पठारावर आठ वर्षे गरगर फिरवले. मराठीतल्या सहासष्ठ नाटककारांनी मात्र त्याला कल्पीत बायांच्या माड्यांवरून फिरवून आणले!*

*पन्हाळ्याला पित्याला दिलेल्या वचनाप्रमाणे ज्याने शेवटी काळाच्या मांडीवर आपली गर्दन ठेवली. शेवटच्या श्वासावेळीही खानदेशवगळता महाराष्ट्रातील एकही किल्ला ज्याने वैऱ्याच्या हाती पडू दिला नाही. आपल्या आरमारातील एकही जहाज बुडू दिले नाही.*


*त्या मंतरलेल्या संघर्षातील हंबीरराव मोहिते, कवी कलश, केसो त्रिमल, खंडो बल्लाळ, निळोपंत पेशवे, कृष्णाजी कंक, रायाप्पा महार, कोंडाजी फर्जंद, महाराणी येसूबाई, दुर्गादेवी, म्हाळोजी घोरपडे अशा नरनारींची आजवर दृष्टीआड केली गेलेली अजब सृष्टी! अचाट, अफाट मानवी प्रयत्न आणि क्रूर नियतीचा दुष्ट खेळ!*

*सह्याद्रीच्या निबिड अरण्यांनी, दऱ्याखोऱ्यांनी, खाड्यांनी आणि सागरकिनाऱ्यांनी, उपलब्ध पण दुर्लक्षित सच्च्या कागदपत्रांनी सांगितलेली शिवपुत्राची अद्‌भुत, चित्तथरारक पण वास्तव महागाथा म्हणजेच **'संभाजी'***

# बंडखोर : ओशो

## तुम्ही विद्रोही म्हणून जगावे यासाठी माझी सगळी धडपड चालू आहे

अनु. माधुरी काबरे




'बंडखोर' हे ओशोंचे मराठीत आलेले ताजे पुस्तक. बंडखोर म्हणजे विद्रोही. रिबेल. विद्रोह करणारा माणूस. रूढीविरुद्ध विद्रोह, सरकारविरुद्ध विद्रोह, सत्तेविरुद्ध विद्रोह - वगैरे बंडखोरीची क्षेत्रे आपल्या परिचयाची असतात. त्यामुळे विद्रोहाबद्दल काही कल्पना आपल्या मनात रुजलेल्या असतात.

ओशो या सर्व कल्पनांना फाटा देऊन, त्यावर फुली मारून, विद्रोहाचा वेगळाच अर्थ सांगतात; आणि विद्रोही माणसाची वेगळीच प्रतिमा समोर ठेवतात.

विद्रोहाचे हे स्वरूप पेश करताना ते सैद्धांतिक किंवा ॲकॅडमिक किंवा ऐतिहासिक मांडणी करीत नाहीत. आल्बेर कामूच्या रिबेल प्रमाणे क्रांतीच्या संदर्भात, राजकीय बंडखोरीचा व्यापक पट ते विचारात घेत नाहीत. दैनंदिन प्रवचनांच्या त्यांच्या नित्यक्रमात काही साधकांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तराच्या ओघात विद्रोह आणि विद्रोही यावर ते भाष्य करीत जातात. या प्रश्नांपैकी काही प्रश्न विद्रोहापेक्षा इतरच समस्यांशी संबंधित असतात. त्यांचेही विवेचन करताना क्वचित विद्रोहाचा उल्लेख ते करतात. त्याचबरोबर इतर विषयांवरची मतेही ते आपल्या नेहमीच्या स्फोटक शैलीत व्यक्त करतात.

ओशोंची अनेक मते मोठी मर्मभेदक, धक्कादायक आणि वास्तववादी असतात. बरट्रँड रसेलच्या पॅराडॉक्सिकल विधानांची आठवण त्यावेळी होते. ओशोंच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि विचारसरणीचे वेगळेपण त्यामुळे मनावर ठसते.

ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटलने विविध ज्ञानशाखांमध्ये मूलगामी सिद्धान्त मांडून ज्ञानक्षेत्रात पायाभूत काम केले. ओशोंच्या मते **'पाश्चिमात्त्य मनांवर कोसळलेले अरिस्टॉटल हे सर्वात मोठे दुर्दैव होय.** ॲरिस्टॉटलने संपूर्ण पाश्चात्त्य मनाची जडणघडण केली. विज्ञाननिष्ठा मार्गाची पाश्चात्त्य जगाला दीक्षा दिली. आजच्या

अण्वस्त्रांच्या रूपात आपल्याला त्यानं दोन हजार वर्षांपूर्वी पेरलेल्या बीजांचे परिणाम दिसतात. त्याने जीवनाचे सरळ दोन भाग केले. एक काळा आणि एक पांढरा. एखादी गोष्ट बरोबर तरी असेल किंवा चूक तरी. मधली काही शक्यता असेल हे त्यानं मानलंच नाही. क्ष हा क्ष आहे, तो य असूच शकत नाही हा ॲरिस्टॉटलचा पाया आहे. एक तर तू माझा मित्र आहेस, नाहीतर शत्रू आहेस. जे कोणी माझे मित्र नसतील ते माझे शत्रू आहेत; ही ॲरिस्टॉटलची एकूणच मांडणी पोरकट आहे, ढोबळ आहे असे ओशो नि:संदिग्धपणे म्हणतात. ॲरिस्टॉटलच्या तुलनेत भगवान महावीर यांचं तर्कशास्त्र जगात सर्वोत्तम आहे, कारण महावीरांनी जगाची विभागणी सातांमध्ये केली आहे. इंद्रधनुष्यातले सात रंग... त्यामुळे त्यांचे तर्कशास्त्र अधिक गुंतागुंतीचे आहे. महावीर प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देताना 'बहुतेक' शब्द वापरून इतर सगळे पर्याय खुले ठेवतात. **पंचवीसशे वर्षांपूर्वी महावीरांनी सापेक्षतावादाचा सिद्धान्त मांडला.** पाश्चात्यांना ते समजायला २५ शतके जावी लागली. (१०३)

असाच दुसरा एक मार्मिक निरीक्षणाचा मासला बघा.

स्त्रियांना तर्कशास्त्र कळत नाही, पण त्यांना एक गोष्ट चांगली कळते की तर्कशास्त्र आवश्यक नाही; तर विजय आवश्यक आहे. पुरुष तार्किक युक्तिवादावर भर देतो आणि स्त्री जिंकण्यावर भर देते.

ओशोंनी बायकांच्या तर्कशास्त्राच्या संदर्भात एक निरीक्षण नोंदवले आहे.

स्त्रीचा स्वभाव गूढ आहे, समजून घ्यायला कठीण आहे असं म्हणणारे कवी मूर्ख आहेत असे ओशो म्हणतात.

स्त्रियांना तर्कशास्त्र कळत नाही, पण त्यांना एक गोष्ट चांगली कळते की तर्कशास्त्र आवश्यक नाही; तर विजय आवश्यक आहे. पुरुष तार्किक युक्तिवादावर भर देतो आणि स्त्री जिंकण्यावर भर देते. तिला तुमच्या युक्तिवादाची काडीमात्र पर्वा नसते. पुरुष तार्किक आणि समंजस असल्याने अनेक गोष्टींची पर्वा करतो. बायकोला शांत करण्याचा प्रयत्न करतो. पण तिचा विजय जोपर्यंत होत नाही तोपर्यंत ती शांत होतच नाही. त्यासाठी ती सारं काही पणाला लावते... प्रत्येक बाईला हे माहीत असते. प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात हे नाटक घडलेलंच असतं. (५७)

**कोणताही नवरा आपल्या बायकोला हरवू शकत नाही हे एक शास्त्रीय वास्तव आहे. (२२)**

आपण काय करतो आहोत, आपली प्रेरणा कशात आहे याबद्दलची ओशोंची भूमिका सुस्पष्ट आहे. "तुम्ही विद्रोही म्हणून जगावं यासाठी माझी सगळी धडपड चालली आहे. तुम्ही इथं प्रवचनाला आलात ते फक्त ऐकण्यासाठी नाही. तर एका



परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जाण्यासाठी इथं आलात... या आगीतून तुम्ही तावूनसुलाखून निघाल, तुमच्यातले हीण जळून नष्ट होईल, एका नव्याचा जन्म होईल... तुमच्या-माझ्यात कसलीही छपवाछपवी असता कामा नये."

ओशो आपल्याकडे येणाऱ्या साधकांना बजावून सांगतात,

"मी तुम्हांला कुठल्याही प्रकारची श्रद्धा शिकवत नाही. मी तुम्हाला फक्त सत्याची तीव्र आस देतो. ते सत्य तुमचं तुम्हीच शोधून काढलं पाहिजे. ते तुम्हाला शोधता येत नाही तोपर्यंत तुमचं सगळं ज्ञान म्हणजे निव्वळ ओझं आहे."(१८)

ओशोंचे आणखी एक विचारांना चालना देणारे विधान बघा.

**"ब्रह्मचारी लोकांत हृदयविकारानं मरणाऱ्यांची संख्या जास्त दिसते. असं का होत असावं?** ब्रह्मचाऱ्यांचे मन आणि अंत:करण परस्परांहून विलग होऊन दूरदूर जातात. अंत:करण आहे तसंच नैसर्गिक राहतं, पण मन नाही नाही त्या आदर्शांनी भरून जाते. ज्या आदर्श कल्पनांचा हृदयाला मागमूसही नाही अशा कल्पनांनी मनात घर करणं हे धोक्याचं आहे. त्यामुळे एक ताण निर्माण होतो. तो असह्य झाला की एक दिवस त्याची परिणती हृदय बंद पडण्यात होते."(२५)

"मी तुम्हांला कुठल्याही प्रकारची श्रद्धा शिकवत नाही. मी तुम्हाला फक्त सत्याची तीव्र आस देतो. ते सत्य तुमचं तुम्हीच शोधून काढलं पाहिजे. ते तुम्हाला शोधता येत नाही तोपर्यंत तुमचं सगळं ज्ञान म्हणजे निव्वळ ओझं आहे."(१८)

विद्रोहाबाबतची त्यांची भूमिका या प्रवचनांमध्ये प्रश्नांच्या उत्तराच्या स्वरूपात प्रकट होते.

"जेव्हा मन मोठमोठ्या कल्पनांनी भरलेलं असतं तेव्हा मनाचं रूपांतर एका उच्च अहंकारात होतं. आपण कुणीतरी महान तज्ज्ञ आहोत, मालक आहोत असं वाटू लागतं. पण मन हे मालक नसतं. ते एक गुलाम असतं. मन एक उत्तम गुलाम बनू शकतं. ते मालक होणं अनर्थकारक ठरतं. तुमचं अंत:करण हेच मालक असलं पाहिजे. मगच मन आणि अंत:करण यात सुसंवाद राहतो. तो आनंद, समाधान, शांती आणि समंजसपण देतो. असा श्रेष्ठ सुसंवादच तुमच्यात एक सर्वश्रेष्ठ विद्रोहाला जन्म देतो. तो विद्रोह वणव्यासारखा पसरत जातो. तेव्हा एका सर्वंकष क्रांतीचा आरंभ होतो. तुमच्यापासून एका क्रांतीचा आरंभ होत आहे ही भावना तुम्हाला अभिमानास्पद वाटायला हवी. **ही क्रांतीच एका नव्या माणसाला आणि एका नव्या मानवतेला जन्म देणार आहे."** (२६)

ओशो रजनीशांची काही निरीक्षणे इतकी स्फोटक आणि प्रक्षोभक असतात की आपल्या रूढ कल्पना उद्ध्वस्त होऊन जातात.

उदाहरणार्थ, राजकारणी माणसे क्रांती करतात. सत्तापालट घडवून आणतात.

परंतु सत्तापालट झाल्यावर नवे सत्ताधीश जे येतात ते काय करतात? सरकार बदलून समाज बदलण्याची ग्वाही देत सत्तेवर आलेले राजकारणी लोक समाजात बदल घडवून आणण्याचा कार्यक्रम अमलात आणण्याच्या आधी सत्ताच त्यांच्यात बदल घडवून आणते आणि पूर्वीसारखीच समाजाची स्थिती दयनीय राहते. राजकारणी माणसे ही कधी खऱ्या अर्थाने विद्रोही किंवा बंडखोर असूच शकत नाहीत; म्हणून ओशो म्हणतात, ''माझा विद्रोही एक राजकारणी नाही.''

मग ओशोंचा विद्रोही हा कसा असतो?

तो क्रांतिकारक नसतो; कारण सर्व क्रांत्या अपयशी ठरल्या आहेत. सरकार बदलून समाज बदलता येतो असे तो मानत नाही. व्यक्तीमध्ये बदल घडवून आल्याखेरीज सरकारमध्ये बदल होत नाही हे त्याला ठाऊक असते म्हणून तो प्रथम स्वत:त परिवर्तन घडवून आणतो; सडलेल्या रूढी, अंधश्रद्धा, विकृत शिक्षणप्रणाली यांच्याशी लढून त्याला नव्या माणसाची निर्मिती करायची असते. हे परिवर्तन बाहेरून नाही तर आतून येईल हे त्याला ठाऊक असते.

रूढीला विरोध करणे म्हणजे विद्रोही नाही. रूढी विरोधक हा विद्रोही नसतो. रूढीविरोधक होणं फार सवंग असतं. विद्रोही होण्यासाठी हिंमत लागते.(३१)

खरा विद्रोही माणूस संपूर्ण भूतकाळापासून सगळे संबंध तोडणारा असतो. नव्या जीवनपद्धतीचा तो पुरस्कर्ता असतो.

यशाचे आणि सत्तेचे शॉर्टकटस स्वीकारणारे लोक चोर, दरोडेखोर, डाकू, लुटारू असतात. जवळच्या वाटेने ते आपली सत्तालालसा, धनलालसा पूर्ण करून घेतात. त्या लोकांना विद्रोही असे मानणे गैर आहे असे ओशो म्हणतात.

विद्रोही हा या खेळाच्या - पैसा, सत्ता, जमीन, बळकावण्याच्या, लुटालुटीच्या खेळीत, गुन्हेगारीच्या मोहपाशात कधीच स्वत:ला गुंतवून घेत नाही.

रूढीला विरोध करणे म्हणजे विद्रोही नाही. रूढी विरोधक हा विद्रोही नसतो. रूढीविरोधक होणं फार सवंग असतं. विद्रोही होण्यासाठी हिंमत लागते.(३१)

विद्रोही माणूस हा कमालीचा संतुलित असतो. नितान्त करुणा असल्याशिवाय, आतून जागृत झाल्याशिवाय हे शक्य नसतं. त्याचं वागणं ही एक प्रतिक्रिया नसते तर ती एक क्रिया असते. ती जुन्याच्या विरोधासाठी नसते तर नव्यासाठी असते.(२८)

विद्रोही माणसाच्या कृती समाजाच्या विरुद्ध जातात हा केवळ योगायोग. तो समाजाच्या विरुद्ध नसतो. तो नव्या माणसाच्या बाजूने असतो. तो समाजाचा कधी राग करत नाही. उलट समाजाबद्दल त्याला पूर्ण सहानुभूती आणि करुणा असते.



जुन्या माणसानं किती सोसलंय हे त्याला ठाऊक असतं. त्याचं दैन्य दूर व्हावं, समाजातला कुरूपपणा दूर व्हावा, माणसाने अधिक नैसर्गिकपणे जगावे, अधिक प्रेमाने, सुखाने जगावे, त्याचे जीवन सुंदर व्हावे अशी विद्रोही माणसाची धडपड असते. (३०)

विद्रोही बनणं हे येरागबाळ्याचं काम नाही. विद्रोही बनणं हे अवघड, धोक्याचं असतं. घाबरवून टाकणारं असतं. ते आव्हानात्मक असतं. ते तुमच्या धैर्याला, तुमच्या आत्म्याला आव्हान देत असते.(३१)

विद्रोह माणूस हा कोणत्याही प्रकारची गुलामी स्वीकारत नाही. तो देवालासुद्धा जुमानत नाही. मग माणसाला जुमानण्याचा तर प्रश्नच नाही.(३२)

मृत्यू कोणत्याही क्षणी येऊ शकतो. तो नेहमी कसा येतो, तर कुठलीही पूर्व सूचना न देता. हे माहीत असूनही आपण सुरक्षिततेच्या मागे लागतो. विद्रोही माणूस सुरक्षिततेची मागणी करत नाही. आयुष्य तो सहजपणे घेतो. आपण काहीही गमावरणार नाही, उलट खूप काही मिळवणारच आहोत म्हणून तो आश्वस्त असतो. आतून.(३३)

अस्तित्व सोडून दुसरा कोणताच ईश्वर नाही की मंदिर नाही. गर्दीतून निघून तुम्ही जोपर्यंत स्वतंत्र व्यक्ती होणार नाही तोपर्यंत तुम्हाला विद्रोही व्यक्ती म्हणून स्वतःची खूण पटणार नाही.

खऱ्या विद्रोही माणसाला जीवनाची क्षणभंगुरता कळलेली असते. तो कशानंच भेदरून जात नाही. त्यामुळं कशाशीही तडजोड करायची गरज त्याला पडत नाही. जर मृत्यू अटळ आहे तर तडजोड कशासाठी? (३३)

मृत्यूला नजर देऊनही त्याचे हास्य मावळत नाही. सगळं जग हास्यानं भरून टाकत असतो. (३४) सगळं जग हा एक सुंदर विनोद आहे असं समजून जगायला सांगतो. (३४)

जन्माला येणारं मूल एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जन्माला येतं. पण मरणारा माणूस स्वतंत्र माणूस म्हणून मेला हे मात्र क्वचितच घडतं.

तुम्ही सगळ्यांनी मरताना सुद्धा जन्माच्या वेळी असता तशा निरागसतेनं, स्वतंत्रतेनं मरावं म्हणून मदत करण्यासाठी मी प्रयत्न करतो आहे. तेच माझं काम आहे. (३७)

तुम्ही विद्रोही म्हणून जगावं यासाठी माझी सगळी खटपट चालली आहे. तुमच्यामध्ये जर विद्रोही चैतन्य नसेल तर तुमच्यात चैतन्यच नसेल; कारण दुसऱ्या कोणत्या प्रकारचं चैतन्यच उपलब्ध नसतं.(३७)

अस्तित्व सोडून दुसरा कोणताच ईश्वर नाही की मंदिर नाही. गर्दीतून निघून तुम्ही जोपर्यंत स्वतंत्र व्यक्ती होणार नाही तोपर्यंत तुम्हाला विद्रोही व्यक्ती म्हणून स्वत:ची

खूण पटणार नाही. (३९) समूहाचा, गर्दीचा एक अंश बनून जगताना, सामूहिक असमंजसपणाच्या महासागरात एका व्यक्तीचा लहानसा समंजसपणा हरवून जातो. सगळ्या युद्धांचं, दंग्यांचं, खुनाचं हेच कारण आहे. (३९) स्वतंत्र व्यक्तीलाच सौंदर्य असते, डौल असतो. अस्तित्वानं त्या व्यक्तीला जन्माला घालून जी संधी दिली त्याचं ती व्यक्ती सोनं करते. (३९)

विद्रोही माणसाच्या दृष्टीने शांती म्हणजे त्याचा प्रकाश, त्याचा सुगंध, आपल्या अंत:करणाशी त्याची असणारी एकतानता. त्याच्या अस्तित्वाशी जुळलेला सूर. मनाचे सगळे संघर्ष केवळ जुन्या स्मृतींच्या रूपात राहतात. ज्याने विद्रोहाचा अनुभव घेतलेला नाही असा माणूस हा दुभंगलेल्या घरासारखा असतो. त्याचं बाह्य आयुष्य हे सत्तेचं राजकारण असतं. पैसा, संपत्ती, प्रतिष्ठा, सत्ता यासाठी आसुसलेलं असतं. आणि आंतरिक आयुष्य हे आपल्या स्वाभाविक उपजत उर्मी विरुद्ध झगडण्यात जात असतं. सहजप्रेरणांशी म्हणजे शरीराशी संघर्ष आणि आत्म्याशीही संघर्ष. शरीर शांत करणं सोपं असतं. आत्म्याची शांती ही अधिक सूक्ष्म, अधिक अदृश्य गोष्ट असते. अस्तित्वाने दिलेल्या प्रत्येक नैसर्गिक प्रेरणेशी संघर्ष करून तुम्ही स्वत:च स्वत:चे शत्रू होत असता. (५०-५१) तुमचं आत आणि बाहेर सतत शीतयुद्ध किंवा युद्ध चालू असतं.(५१)

विद्रोही जन्माला आल्याखेरीज स्वातंत्र्य शक्य नाही. विद्रोह्यांची मूलभूत गरज असते ती मुक्तता. आपल्या भूतकाळापासून आपली मुक्तता. राष्ट्रापासून मुक्तता, धर्मापासून मुक्तता. त्यासाठी ध्यान तुम्हाला मदत करील.

तुम्हांला शांती, समाधान, चिंतामुक्ती हवी असेल तर त्या क्षणापासून सुरुवात करा. त्यासाठी जग जिंकायला हवं ही अट नसतेच मुळी! (५२) शांती ही अगदी स्वाभाविक गोष्ट आहे. आईच्या पोटात नऊ महिने तुम्ही किती विलक्षण शांत असता! (५३) शांती हाच तुमचा स्वभाव आहे.(५३) पण माणूस हा शांतीलाच आपली महत्त्वाकांक्षा करू लागतो तेव्हा त्याच्या खुळेपणाचा कळस होतो.

शांतीची आसक्ती म्हणजे अडथळा. ज्या क्षणी तुम्ही आपल्या सगळ्या आशाआकांक्षांचा, महत्त्वाकांक्षांचा त्याग कराल त्या क्षणी तुम्हाला एका अपूर्व शांतीचा अनुभव येईल.(५३)

एका प्रबुद्ध, सुंदर, डौलदार कृपामय विश्वात जागृत होऊन जगणं हाच खऱ्याखुऱ्या विद्रोह्यांचा मार्ग असतो. (६१)

विद्रोही जन्माला आल्याखेरीज स्वातंत्र्य शक्य नाही. विद्रोह्यांची मूलभूत गरज असते ती मुक्तता. आपल्या भूतकाळापासून आपली मुक्तता. राष्ट्रापासून मुक्तता, धर्मापासून मुक्तता. त्यासाठी ध्यान तुम्हाला मदत करील. ध्यानामुळं तुम्ही स्वतंत्र



व्यक्ती व्हाल. **आध्यात्मिक दृष्ट्या स्वतंत्र व्यक्तींचा समूह होणे हाच सोनेरी भविष्यकाळाकडे जाण्याचा मार्ग आहे.** (६९)

विद्रोही व्यक्तीला कुणी मार्गदर्शक नसतो, कुणी ठरवून दिलेला वाटचालीचा नकाशा नसतो. प्रत्येक क्षणी तो एका नव्या अवकाशात प्रवेश करत असतो. स्वत:च्या सत्यात प्रवेश करीत असतो. त्याचा स्वत:चा आनंद असतो. (७५)

विद्रोह्याला मार्ग असा नसतोच. तो चालत राहतो आणि त्याच्या पायाखाली रस्त्याचा जन्म होतो. आकाशात उडणाऱ्या पक्ष्याला कुठला मार्ग असतो? कोणताही पक्षी आपल्या पाऊलखुणा सोडतच नाही. म्हणून तर आकाश सदैव खुलं असतं. भरारी घ्या आणि आपला मार्ग आपणच बनवा... तुम्हाला आनंद देणारी दिशा शोधून काढा.(७५)

तुमचा मार्ग तुम्हांलाच घडवायचा असतो. तुमचा मार्ग दुसऱ्या कोणाचा मार्ग नसतो. तुम्ही जर दुसऱ्या कोणाच्या मार्गावरून चालू लागला तर तुमचं स्वत:चं व्यक्तिपणच हरवून जाईल; आणि अस्तित्वाच्या सर्वोत्कृष्ट अनुभवालाच पारखे होऊन जाल. (७७) स्वत:ला हरवून काय मिळणार आहे तुम्हाला?(७७)

विद्रोही माणूस कधीही कोणत्याही कळपात जात नाही. तो कोणत्याही संघटनेचा, पंथाचा वा तत्त्वप्रणालीचा अनुयायी नसतो. तो स्वत:मध्येच खोलवर खणतो आणि जीवनरस शोधून काढतो.

विद्रोही माणूस कधीही कोणत्याही कळपात जात नाही. तो कोणत्याही संघटनेचा, पंथाचा वा तत्त्वप्रणालीचा अनुयायी नसतो. तो स्वत:मध्येच खोलवर खणतो आणि जीवनरस शोधून काढतो.(७९) विद्रोह हा स्वत:चा मार्ग असतो. त्याला कोणी मार्ग दाखवण्याची गरज नसते.(७९)


अस्तित्व हेच माझं घर. मी इथं कुणी परका नाही. मला जे काही आवश्यक आहे ते माझ्यातच आहे अशी विद्रोह्याची घोषणा असते.(७९)

दोन व्यक्तींमध्ये जे प्रेम असतं, तेच विद्रोह आणि संपूर्ण अस्तित्व यांच्यामध्ये भक्ती बनून येतं. भक्ती हा काही मार्ग नव्हे. व्यक्तिमत्त्वाचा मृत्यू होणं म्हणजे भक्ती. भक्ती म्हणजे प्रेमाचं सर्वोच्च रूप (८०)

जीवन हा एक पूल आहे. इथं घर बांधून मुक्काम ठोकायचा नसतो. ओलांडून पलीकडं जायचं असतं. (८१)

प्रेम तुमच्यासाठी एक पूल बनतं. वैश्विक एकतेकडे घेऊन जाणारा पूल. एक द्वार बनतं. सिंधूमध्ये बिंदू होऊन स्वत:ची ओळख विरघळवून टाकण्याच्या अनुभवाकडं नेणारं द्वार.(८१)

**पृष्ठे : १२८ ● किंमत : ९०रु. ● सभासदांना : ६८रु. ● पोस्टेज : २०रु.**




# गॉन फॉर गुड

**अनेक अनपेक्षित आणि धक्कादायक वळणे घेत जाणारी अफलातून थरारकथा**

**हार्लन कोबेन**
**अनु. अजित ठाकूर**

''तुझा भाऊ, केन जिवंत आहे.'' आईचे अखेरचे शब्द विली क्लाइनच्या कानावर येतात.

'गॉन फॉर गुड' या थरारकथेचा हा आरंभ वाचकाला खिळवून टाकणारा आहे. 'भाऊ जिवंत आहे' हा तिचा संदेश विलीला आश्चर्यचकित करणारा, धक्का देणारा का वाटावा? कारण बारा वर्षापूर्वी आपली मैत्रीण ज्युली मिलर हिच्यावर बलात्कार करून तिचा खून केल्याचा आरोप केनवर असतो आणि तेव्हापासून तो परागंदा असतो. पोलिसांच्या हातावर तुरी देऊन जगत असतो. त्याच्या आईची खात्री असते की केन खुनी नाही; त्याला उगीच त्या प्रकरणात गोवण्यात आलेले आहे. तो प्रसंगाचा बळी आहे; तो काहीतरी अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करून परत येणार आहे, असे ती आपल्या नवऱ्यालाही असते... आईच्या उशाशी केनचा बर्फाच्छादित शिखराच्या पार्श्वभूमीवरचा फोटोही विलीला 'तो हयात आहे' हेच दर्शवितो. पण गेल्या अकरा वर्षात केनने आपल्या कुटुंबाशी एकदाही संपर्क साधलेला नसतो. तो जिवंत असता तर त्याने संपर्क नक्की साधला असता. विलीला साहजिकच वाटते. आपल्या या भावाचा शोध घ्यायला हवा. तो जिवंत आहे का हे बघायला हवे. खून झालेल्या ज्युलीची धाकटी बहीण केटी ही देखील त्यासाठी मदतीचा हात पुढे करते.

विली न्यूयॉर्कमधल्या एका समाजकल्याण संस्थेत कामाला असतो. घरातून पळून आलेल्या मुलांना आसरा देऊन त्यांचे पुनर्वसन करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट. तेथेच स्वयंसेविका म्हणून आलेली शीला विलीला वेड लावते. ती त्याच्या बरोबर राहू लागते. पण एके दिवशी गायब होते. 'नेहमीच तुझ्यावर प्रेम करणारी' अशी चिठ्ठी तेवढी टेबलावर मिळते.



- आणि एक दिवस पोलिस विलीकडे येऊन विचारतात, ''शीला रॉजर्स कुठे आहे?'' विली पोलिस उपप्रमुख जोसेफ पिस्टिलो याला भेटतो; तर तो न्यू मेक्सिकोमधील एका गुन्ह्याची चित्रफीत संगणकावर दाखवून म्हणतो की या गुन्ह्यात बोटांचे ठसे जे सापडले ते शीला रॉजर्सच्या ठशांशी जुळतात. ''तिच्या गुन्हेगारीचा इतिहास आणि ती स्वत: यांचा शोध आम्ही घेत आहोत.''

बिली आपल्या संस्थेच्या दप्तरातून शीलाचा अर्ज शोधून तिच्या आईला इडाहो येथे फोन करतो. शीलाची आई सांगते,''पोलिस येथेही चौकशीला आले होते. तुम्ही तुमचं आयुष्य चालू द्या. माझी मुलगी - कार्ली - तुमच्या आयुष्यात आली होती हे विसरून जा.''

विलीला त्याचा योगशिक्षक मित्र स्क्वेअर्स हा शीलाबद्दल अधिक माहिती देतो. ''मिडवेस्टमधून पळून आलेली शीला बसमधून उतरली आणि वेश्याव्यवसायात अडकली. सोळाव्या वर्षी ती प्रथम पोलिसांच्या हाती सापडली. नंतरही तीनदा ती अटकेत होती. लुई कास्टमन या दलालासाठी ती काम करीत होती. तिच्याजवळ गांजा आणि सुरा मिळाला. तेव्हा मादक पदार्थांचा व्यापार आणि सशस्त्र दरोडा या आरोपांवरून तिच्यावर खटला झाला. पण ती सुटली.''

''मिडवेस्टमधून पळून आलेली शीला बसमधून उतरली आणि वेश्याव्यवसायात अडकली. सोळाव्या वर्षी ती प्रथम पोलिसांच्या हाती सापडली. नंतरही तीनदा ती अटकेत होती.

तेथील वेश्यावस्तीत जाऊन शीलाचा फोटो दाखवून स्क्वेअर्स तपास करतो. ''आम्ही या मुलीला वाचवायचा प्रयत्न करतोय... काही वाईट लोक तिच्या मागे लागलेले आहेत.''

स्त्रीच्या वेषात वावरणाऱ्या रॅकेलकडूनही शीलाची, तिच्या एजंटची माहिती मिळवण्याचा प्रयत्न होतो.

तेवढ्यात ग्रँड आयलंड, नेब्रास्का येथे शीलाचा मृतदेह सापडतो. तिच्यावर बलात्कार झाल्याच्या खुणा आढळतात. कुणीतरी खून करून तिला गाडीतून रस्त्यावर आडबाजूला टाकलेले असते. बरगड्यांचा पूर्ण भुगा झालेला. स्तनावर सिगरेटच्या चटक्यांचे व्रण.

पोलिस उपप्रमुख जोसेफ पिस्टिलो स्क्वेअर्सला विलीकडे पाठवून भेटायला ये असा निरोप देतो.

त्या आधी विलीला त्याचा एक शाळकरी मित्र जॉन ॲसेल्टा हा जवळजवळ १२ वर्षांनी भेटतो. तो परदेशातून आलेला असतो. तो ज्युलीची चौकशी करतो.

केनला बघून १२ वर्षे झाली असे सांगतो; आणि विलीला खाली पाडून हाताची कैची करून अडकवून म्हणतो, ''केनला सांग इतर लोकांना त्रास देऊन तू, तुझे वडील, तुझी बहीण किंवा मिलरची ती छोटी मुलगी केटी- सर्वांना त्रास होईल...'' आणि त्याच्या नाकावर दणका देऊन निघून जातो. जॉनला घोस्ट असेच सर्वजण म्हणत असतात - त्याची प्रचीती पुन्हा येते... नाकाची दुखापत तशीच असताना विली पोलिस उपप्रमुख पिस्टिलो याला भेटतो. शीला या जगात नाही हे त्याला कळते तेव्हा त्याचे आतडे पिळवटून निघते.

शीलाला श्रद्धांजली वाहण्यासाठी त्या समाजकल्याण संस्थेत प्रार्थना सभा होते. शीलाची आईही त्या सभेला उपस्थित राहते. सभेनंतर शीलाची आई विलीला सांगते, ''शीला जिवंत होती तेव्हा अभिमान वाटावा असं तिनं काहीही केलं नाही... मी इथे आलेय ते शीलासाठी नाही. तर कार्लीसाठी.''

''कार्ली कोण?''

विलीला प्रश्न पडतो, ''शीला आपल्या जीवनात आली यामागं काहीतरी कटकारस्थान असलं पाहिजे... ती आपल्याशी खोटं वागली. हा योगायोग? की ठरवून केलेला बनाव?''

''तुला माहीत नाही? शीलाने कधी कार्लीचा उल्लेख केला नाही?'',

''नाही.''

''कार्ली शीलाची मुलगी आहे... बारा वर्षांची. तिचे वडील कोण ते मला ठाऊक नाही.'' आणि शीलाची आई पर्समधून एक फोटो काढून दाखवते. लहान मुलगी. जन्मतारीख...

''आता ती कुठे आहे?'' विलीचा प्रश्न.

''मला माहीत नाही. म्हणून तर मी इथे आलेय. माझ्या नातीला शोधायला.''

ज्युलीची बहीण केटी मिलर ही आपल्या बहिणीच्या खुनाचा सतत विचार करीत असते ती विलीला भेटून म्हणते, ''केनने तिचा खून केला नाही असे मानले तर मग खून कुणी केला? त्या खुनाच्या आधी वर्षभर तुम्ही दोघे वेगळे झाला होता - तर मग शेवटी ती कशात गुंतली होती?'' केटी घरी जाऊन ज्युलीच्या जुन्या पेटीतील वस्तू बघते. तेव्हा तिला ज्युलीच्या वसतिगृहातल्या पार्टनरची माहिती मिळते. तिचे नाव असते शीला रॉजर्स. इडाहो. जनसंपर्क विषयातील पदवीधर. ही माहिती ती विलीला देते ज्युलीचा खून झाला. अकरा वर्षापूर्वी. आता तिची रूमपार्टनर असलेल्या शीलाचाही खून झाला. पहिल्या खुनाचा आरोप विलीच्या भावावर.....''

विलीला प्रश्न पडतो, ''शीला आपल्या जीवनात आली यामागं काहीतरी कटकारस्थान असलं पाहिजे... ती आपल्याशी खोटं वागली. हा योगायोग? की ठरवून केलेला बनाव?''



लिव्हिंगस्टनच्या त्या वसतिगृहातील त्यावेळच्या गटप्रमुख रोझा बेकर यांची गाठ किटी आणि विली घेतात. रोझ शीलाचा खूनही ज्युलीप्रमाणे गळा दाबून झाला का असे विचारते आणि लॉरा इमर्सन या त्यावेळच्या हॉस्टेलमधील मुलीचाही तसाच खून आठ महिन्यापूर्वी झाल्याची माहिती देते. एफबीआयने ही माहिती स्वत:जवळच ठेवण्याचा सल्ला रोझला दिलेला असतो. असे का?

विली किटीला घेऊन पोलिस उपप्रमुख पिस्टिलोकडे जातो. लॉरा इमर्सनच्या खुनाबद्दल विचारतो. **खून झाला त्या तिन्ही मुली एकाच वसतिगृहातल्या - हा योगायोगच मानायचा का?**

पिस्टिलो त्यांना सांगतो, ''तुम्ही दोघं या प्रकरणापासून दूर राहा... तुमचंच संरक्षण करायचा मी प्रयत्न करतो आहे?'' ''कुणापासून?'' या विलीच्या प्रश्नाचं उत्तर देण्याचे तो टाळतो. पण नंतर त्याला म्हणतो, ''तू अजूनही प्रेम करीत असलेल्या मुलीबरोबर तुझा भाऊ एकाच शय्येवर... तू त्या घराजवळून रात्री फिरायला चालला आहेस. ती तिथे मृतावस्थेत सापडतं. गुन्ह्याच्या ठिकाणी तुझ्या भावाचं रक्त सापडतं... तू सांगतोस की हे काम तुझ्या भावाचं नाही. ...अशा वेळी आम्ही काय समजायचं? कुणावर संशय घ्यायचा?''

विली किटीला घेऊन पोलिस उपप्रमुख पिस्टिलोकडे जातो. लॉरा इमर्सनच्या खुनाबद्दल विचारतो. खून झाला त्या तिन्ही मुली एकाच वसतिगृहातल्या - हा योगायोगच मानायचा का?

केटी विलीला विचारते, ''तुझ्या भावाला ज्युलीबरोबर झोपताना काहीच वाटलं नाही?''

''तो त्याचा दोष नव्हता. त्यानं मला विचारलं होतं. माझं तिच्यावर प्रेम होतं का? मी म्हणालो होतो, मागे होतं. आता नाही. ...''

''मग तूच त्याचा पाठलाग सुरू केलास?''

''तुला कळलं नाही.''

... त्या रात्री विलीवर हल्ला होतो. हल्लेखोर काळ्या बुरख्यात असतो. विलीचे तोंड टेपने बंद करतो. त्याचे हात बेड्यांनी पलंगाला जखडतो.''

बुरखेधारी केटीच्या खोलीत शिरतो. तिची किंकाळी ऐकू येते. विलीची शुद्ध हरपले. पुन्हा शुद्ध येते तेव्हा केटीची हाक ऐकू येते. जॉन...जॉन ॲसेल्टा...म्हणजे घोस्ट...

विली हलासन करून पलंग दाराकडे सरकवून, भिंतीला धडकवतो. पलंगाच्या दांड्या सुटतात. तो किटीच्या हल्लेखोराशी झटापट करतो... बेशुद्ध पडतो.

इस्पितळात त्याला पोलिस उपप्रमुख पिस्टिलो भेटतो. तेव्हा जॉन अशी किटीने हाक मारल्याचे विली सांगतो. जॉन ॲसेल्टा... घोस्ट... इथल्या गुंडांपैकी एक... तो जे करतो त्यात तरबेज आहे. परदेशात राहतो... त्याने तुला बेड्या का घालाव्या? विली तर्क लढवतो. केटीचा गळा दाबून, माझं रक्त तिथं सापडण्याची व्यवस्था करायचा तर हेतू नसेल? ज्युलीच्या खुनाच्या जागी माझ्या भावाचं - केनचं रक्त सापडलं होतंच की!

पिस्टिलो त्याला सांगतो, ''तू आज तुरुंगात जाणार आहेस... तुझ्या भावाला विचार.''

केन जिवंत आहे... तो निर्दोष आहे... स्वत:चा निर्दोषपणा सिद्ध करण्यासाठी तो अज्ञातवासात आहे असे आई म्हणत असे; असे विलीला त्याचे वडील सांगतात. त्याचबरोबर केनचा शाळेपासूनचा दोस्त. फिलिप मॅकग्वेन याचीही माहिती सांगतात. वर्गाचा मॉनिटर... बोनॅनो या कुप्रसिद्ध माफिया कुटुंबाच्या जुन्या जागेत राहणारा... हायस्कूलमध्ये ॲसेल्टा, मॅकग्वेन आणि केन हे तिघे मित्र होते. पण पुढे त्यांचे काहीतरी बिनसले. ॲसेल्टा फार धोकादायक आहे.''

शवपेटीतला शीलाचा देह पाहून विली चक्रावतो.तो ज्या मुलीच्या प्रेमात होता, जिच्याबरोबर काही काळ राहिला होता ती ही शीला रॉजर्स नव्हती. शवपेटीतल्या त्या स्त्रीला त्याने कधीच बघितलेले नसते.

- बापलेक परत घराकडे निघतात तर वाटेत नेमका जॉन ॲसेल्टा - घोस्ट भेटतो. शाळेतले दिवस आठवून घोस्ट वडिलांना सांगतो, ''मि. क्लाइन. मला सत्य हवंय. मला तुम्ही नको आहात. तुम्ही आहात तसेच ठीक आहात.''

शीला रॉजर्सच्या अत्यंविधीसाठी विली आणि स्क्वेअर्स दोघे जातात.

शवपेटीतला शीलाचा देह पाहून विली चक्रावतो.

तो ज्या मुलीच्या प्रेमात होता, जिच्याबरोबर काही काळ राहिला होता ती ही शीला रॉजर्स नव्हती. शवपेटीतल्या त्या स्त्रीला त्याने कधीच बघितलेले नसते.

स्क्वेअर्सलाही तसेच वाटत होते.

''मादक पदार्थांची विक्री, ज्युलीची रूम पार्टनर, केनच्या खोलीत सापडलेले ठसे - हे सगळे आपण ज्या शीलाबद्दल ऐकले ती ही व्यक्ती होती. आपण शीला म्हणून जिला ओळखत होतो तिने यापैकी काहीच केले नव्हते आणि तसल्या त्या



स्त्रियांपैकी सुद्धा ती नव्हती... खरी शीला रॉजर्स - जिचं दफन आता झालं ती केनबरोबर फिरत होती. खुनाच्या ठिकाणी तिचे ठसे त्यामुळेच सापडले... तिच्याबरोबर कार्ली ही मुलगी होती.''

हे सर्व जर खरे तर विलीबरोबर राहणारी, त्याच्यावर प्रेम करणारी स्त्री कोण होती?

स्क्वेअर्सचा दुसऱ्या दिवशी फोन येतो. ''मला वाटतं, आपली शीला सापडली आहे.'' एका डिटेक्टिव्ह एजन्सीला स्क्वेअर्सने तिचा शोध घेण्याचे काम दिले; आणि तिने शीला रॉजर्सच्या क्रेडिटकार्डावरून तिचा ठावठिकाणा लावला होता. ती न्यूयॉर्कमध्येच होती. हॉटेल रेजिनामध्ये. त्याच्या घरापासून एक मैल अंतरावर...

विली तिला गाठतो. ती त्याला जवळच्या रेस्टॉरंटमध्ये घेऊन जाते. आणि त्याला सांगते, ''माझं खरं नाव नोरा स्प्रिंग... मला तुला दुखवायचं नव्हतं... केन मला म्हणाला की तुला सांगितलं असतं तर तुला कदाचित् तू मला मारून टाकलं असतं... मी तुझ्याशी खोटं बोलत आले... पण तुझ्यावर माझं खूप प्रेम आहे. ...माझं लग्न झालेलं आहे... पाच वर्षापूर्वी. नवरा क्रे माझा खूप छळ करायचा, म्हणून मी पळून आले. तो पोलिस होता. एका आधारगृहाने मला यूरोपला जायला मदत केली. तेथे एका अमेरिकन कुटुंबाशी ओळख झाली. शीला, तिचा नवरा आणि कार्ली नावाची मुलगी... केन तुझ्याबद्दल बोलत असे... माझ्या एका मैत्रिणीने नवरा क्रे माझ्या शोधासाठी डिटेक्टिव्ह एजन्सीकडे गेला आहे असे कळवले. तेव्हा मी न्यूयॉर्कला येण्याचे ठरवले. शीला आणि मी - आम्ही ओळखपत्रांची अदलाबदल केली... न्यूयॉर्कला तुझ्या संस्थेत मी जाणूनबुजून कामाला आले. तुला भेटण्याआधीच मी तुझ्या प्रेमात पडले होते. तुला पाहिल्यावर तर आपला निर्णय बरोबर अशी माझी खात्री झाली. पण केनची ओळख देणे धोक्याचे असल्याने त्याच्याबद्दल बोलण्याचे मी कटाक्षाने टाळले... तुझ्या आईला मात्र मी इस्पितळात केन जिवंत असल्याचे सांगितले. त्याने खून केलेला नव्हता हेही सांगितले. केन न्यू मेक्सिकोला आला. त्याने नंतर शीला आणि कार्लीलाही बोलावून घेतले. पण केनच्या घरी दोघे मारेकरी घुसले तेव्हा त्याने त्या दोघांना ठार मारले. शीला गंभीररीत्या जखमी झाली. तिच्या हाताचे ठसे तेथे सापडले. न्यू मेक्सिकोतील एका बूथवरून शीलाने केलेल्या

तेव्हा मी न्यूयॉर्कला येण्याचे ठरवले. शीला आणि मी - आम्ही ओळखपत्रांची अदलाबदल केली... न्यूयॉर्कला तुझ्या संस्थेत मी जाणूनबुजून कामाला आले. तुला भेटण्याआधीच मी तुझ्या प्रेमात पडले होते. तुला पाहिल्यावर तर आपला निर्णय बरोबर अशी माझी खात्री झाली.

फोनमुळे पोलिसांचा ससेमिरा विलीमागे लागला.''

त्याचवेळी कार्लीबद्दल केनने आधी कधीच काही सांगितलेले नसल्याने तो निघून जायच्या आधीच्या सहा महिन्यात जे काही घडले त्याबद्दलचे गूढ वाढले.

...अकरा वर्षांपूर्वी केन मॅकग्वेन आणि घोस्ट या मित्रांबरोबर काहीतरी बेकायदा धंद्यात अडकला; पोलिसांच्या ताब्यात सापडला. तेव्हा मॅकग्वेनला पकडण्यासाठी मदत केलीस तर तुझ्यावर खटला भरणार नाही असे पोलिसांनी सांगितले. केन भूमिगत झाला. केन आणि ज्युली यांचा त्या दरम्यान संबंध आला असावा. घोस्टने त्यांना कधीतरी बघितले असावे आणि त्यामुळेच त्यांच्यावर हल्ला चढवला असावा, केन जखमी झाला पण पळून गेला. ज्युलीचा मात्र बळी गेला. केन शीला रॉजर्स आणि नवजात कार्ली यांना घेऊन परागंदा झाला. काही वर्षे जातात. केनला पकडून पोलिस त्याला अमेरिकेत आणतात. मॅकग्वेन आणि घोस्ट यांना पकडण्यासाठी त्याला पुन्हा प्रवृत्त करतात. न्यू मेक्सिकोमध्ये त्याच्या राहण्याची व्यवस्था करतात. ... सुरक्षिततेची खात्री झाल्यावर तो शीला - कार्लीला बोलावून घेतो. पण मॅकग्वेनला त्याचा पत्ता लागतो. दोन मारेकऱ्यांना तो पाठवतो. केन नसल्याने ते शीलाचा छळ करतात. केन त्या दोघा मारेकऱ्यांना ठार मारतो. आपली जखमी प्रेमिका आणि कार्ली यांना घेऊन पळून जातो. शीलाचं ओळखपत्र घेऊन फिरणाऱ्या नोराला सावध करतो. तिलाही पळून जाणं भाग पडतं...

केन भूमिगत झाला. केन आणि ज्युली यांचा त्या दरम्यान संबंध आला असावा. घोस्टने त्यांना कधीतरी बघितले असावे आणि त्यामुळेच त्यांच्यावर हल्ला चढवला असावा,

...असा कथाभाग उलगडत जातोय असे आपल्याला वाटते.

...पण अजूनही बरीच वळणे - आडवळणे या कथावस्तूला आहेत.

कथानकाच्या भुलभुलैयात आपण गरगरत राहतो.

शेवटी शेवटी तर धक्क्यावर धक्के देण्यात लेखकाचे कौशल्य विशेषच बहराला आल्याचे दिसून येते.

एका साध्याशा वाटणाऱ्या घटनेभावेती नात्यागोत्यांचे आणि संघर्षाचे कितीतरी गोफ विणले जातात - ते मूळातूनच बघणे इष्ट!

**पृष्ठे : ३८० ● किंमत : २५० रु. ● सभासदांना : १८८ रु. ● पोस्टेज : २० रु.**






### * यशवंतराव गडाख यांना नरुभाऊ लिमये पुरस्कार

''आमदार यशवंतराव गडाख यांनी राज्यातील सहकार क्षेत्राला नवी दिशा आणि आधुनिक विचार देण्याचे मोठे कार्य केले आहे,'' अशी प्रशंसा मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी केली.

महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयातर्फे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री. गडाख यांना 'नरुभाऊ लिमये स्मृती आर्यभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. दहा हजार रुपये, स्मृतिचिन्ह, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. जलसंपदामंत्री अजित पवार अध्यक्षस्थानी होते. 'सिंबायोसिस'चे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार प्रमुख पाहुणे होते. श्री. गडाख यांचे आत्मकथन असलेल्या 'अर्धविराम' या पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीचे प्रकाशनही झाले.

''राज्यातील इतर कोणत्याही भागापेक्षा नगर जिल्ह्यात सहकार क्षेत्रात काम करणे, हे सर्वाधिक अवघड आव्हान आहे. काम करणाऱ्या व्यक्तीच्या पुढे किती अनंत अडचणी उभ्या केल्या जातात, हे श्री. गडाख यांनी अनुभवले, नगर जिल्ह्यातील अनेक दिग्गज नेत्यांच्या स्पर्धेतही श्री. गडाख टिकून राहिले. एवढेच नव्हे, तर तेथे त्यांनी आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. ते समन्वयवादी असल्यामुळेच हे शक्य झाले.''

''राजकारणातील व्यक्तींबद्दल साहित्यिक, सांस्कृतिक वर्तुळात अनेकदा नकारात्मक प्रतिमा असते. त्यांच्यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांनी पूर्वी केला. श्री. गडाख यांनीही तोच विचार पुढे चालू ठेवण्याचे काम केले आहे. संयम आणि सबुरीचे त्यांनी पालन केले,'' असे श्री. देशमुख म्हणाले.

श्री. अजित पवार म्हणाले, ''समर्थ शेतकरी, सक्रिय कार्यकर्ता-नेता, जाणता रसिक, सुसंस्कृत लेखक अशा अनेकविध गुणांनी श्री. गडाख यांचे व्यक्तिमत्त्व विकसित झाले आहे. त्यांनी सोनई परिसराचा पूर्ण कायापालट केला आहे. केवळ सत्ता व पैसा यांच्या माध्यमातून असे कार्य होत नाही, एखादा माणूस जीव ओतून काम करतो, तेव्हाच ते शक्य होते.'' श्री. गडाख यांच्या आयुष्यात अनेक चढ-उतार आले. त्या प्रत्येक वेळी त्यांचा सुसंस्कृतपणा कायम राहिला, असे गौरवोद्गार डॉ. मुजुमदार यांनी काढले.

श्री. गडाख म्हणाले, ''जीवनात निराशेचेही क्षण येत असतात; तथापि अशा

पुरस्कारांमुळे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना मोठा दिलासा मिळतो. दूध, साखर यांच्या उत्पादनात भारत पहिल्या क्रमांकावर आहे. आपण अन्नधान्याचीही निर्यात करतो. ही कामगिरी एका दिवसात झालेली नाही. हे विधायक कार्य उभारण्यात सहभागी कार्यकर्त्यांना पुरस्काराद्वारे उभारी देण्याचे काम ही संधी करीत आहे.''

श्री. गडाख यांच्या पत्नी सौ. शारदा यांचाही सत्कार झाला. 'सकाळ'चे राजीव साबडे 'लोकसत्ता'चे मुकुंद संगोराम आणि 'साहित्य शिवार'चे जयराम देसाई यांची निवड समिती होती. अंकुश काकडे यांनी स्वागत केले.

### * 'साप्ताहिक सकाळ'ला उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार

मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या २००४ च्या दिवाळी अंक स्पर्धेत उत्कृष्ट अंकासाठीचे दीनानाथ दलाल स्मृतिचिन्ह 'साप्ताहिक सकाळ'ला मिळाले आहे.

'साप्ताहिक सकाळ' दिवाळी अंकाला मुंबई मराठी पत्रकार संघाचा हा चौथा पुरस्कार असून, आतापर्यंत विविध संस्थांनी ठेवलेले बारा पुरस्कार 'साप्ताहिक सकाळ'ला मिळाले आहेत. पारितोषिक वितरण समारंभ १३ जूनला मुंबईत झाला, मुंबई दूरदर्शन केंद्राचे संचालक मुकेश शर्मा प्रमुख पाहुणे होते. १३ जून हा विख्यात पत्रकर्ते आचार्य प्र. के. अत्रे व श्री. रा. टिकेकर यांचा स्मृतिदिन आहे. पुरस्कार वितरणानंतर 'गोची दिवाळी अंकांची' या विषयावर परिसंवाद झाला.

### * बापू वाटवे यांना माणूस पुरस्कार

'समाजापुढे आदर्श निर्माण करण्यासाठी माणूसपणाचे दर्शन घडविणाऱ्या संस्था टिकविल्या पाहिजेत,' असे आवाहन पुण्याचे पोलिस सहआयुक्त प्रभात रंजन यांनी केले.

रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे 'प्रभात'च्या सुवर्णकाळाचे अभ्यासक बापू वाटवे यांना 'माणूस' पुरस्कारप्रदान करण्यात आला. प्रतिभा शाहू मोडक अध्यक्षस्थानी होत्या. पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. श्रीमती मोडक यांनी बापू वाटवे आणि शाहू मोडक यांच्या आठवणी सांगून 'चांगले काम करणाऱ्या पोलिसांनाही या पुरस्काराने सन्मानित करा,' असे आवाहन केले. ''या पुरस्काराच्या निमित्ताने माणूस शोधण्याची प्रक्रिया सुरू झाली असून ती कायम राहील,'' असे श्री. धिवरे म्हणाले. बापू वाटवे यांनी 'प्रभात'च्या वाटचालीचा आलेख मांडला.

### * इस्माईल कादर यांना 'मॅन बुकर पुरस्कार'

अल्बानियाचे ज्येष्ठ कवी आणि कथाकार इस्माईल कादर यांना पहिलावहिला आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'मॅन बुकर पुरस्कार' जाहीर झाला आहे. ६० हजार पौंड व चषक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. एडिंबरो येथे २७ जून रोजी ६९ वर्षांच्या कादर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कादर यांच्या 'ब्रोकन एप्रिल', 'स्प्रिंग फ्रोस्ट' आणि 'दी जनरल ऑफ दी डेड आर्मी' या पुस्तकांची दखल मॅन बुकर पुरस्कारांच्या तीन सदस्यांच्या परीक्षक मंडळाने



घेतली.

कादर जागतिक स्तरावरील लेखक आहेत. त्यांच्या लिखाणात संस्कृती, इतिहास, राजकारण, भावना यांचा चांगला संगम आढळतो, असे कौतुक परीक्षक मंडळातील जॉन कॅरे यांनी केले.

कादर यांच्या व्यतिरिक्त इतर १८ लेखकांनाही पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.

### * मधुकर तोरडमल आणि आशालता जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी

अ. भा. मराठी नाट्य परिषदेच्या ज्येष्ठ रंगकर्मीसाठी असणाऱ्या २५ हजार रुपयांच्या पुरस्काराचे मानकरी होण्याचा बहुमान ज्येष्ठ नाटककार, दिग्दर्शक व अभिनेते मधुकर तथा मामा तोरडमल आणि ज्येष्ठ अभिनेत्री आशालता यांनी पटकावला आहे.

शासन पुरस्कृत प्रशस्तीपदकासह प्रत्येकी पाच हजार रुपयांचे राम गणेश गडकरी पुरस्कार - नाटककार सतीश आळेकर, बालगंधर्व पुरस्कार - ज्येष्ठ अभिनेत्री कान्होपात्रा, चिंतामणराव कोल्हटकर पुरस्कार - ज्येष्ठ प्रभाकर पणशीकर आणि केशवराव भोसले पुरस्कार - ज्येष्ठ गायक अभिनेते रामदास कामत यांना देण्यात आले आहेत. २००४ सालातील सर्वोत्कृष्ट व्यावसायिक नाट्यनिर्मितीचा पुरस्कार एकदंत क्रिएशन्सच्या 'हम तो तेरे आशिक है' या नाटकाला, तर सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाट्यनिर्मितीचा पुरस्कार 'फायनल ड्राफ्ट'ला मिळाला आहे.

१४ जून रोजी गो. ब. देवल स्मृतिदिनी नाट्य परिषदेच्या कलावंत मेळाव्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रदीर्घ काळ रखडलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुलाचे उद्घाटनही याच वेळी झाले.

त्याचप्रमाणे एकपात्री कार्यक्रम सादर करणाऱ्यांकरिताचा एक हजार रु.चा प्रथम पुरस्कार रंगनाथ कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला.

अन्य पुरस्कारविजेते असे - नाट्यसमीक्षा - संजय डहाळे (सामना), बालरंगभूमी- जयंत तारे, होतकरू रंगकर्मी- धनंजय जोशी, कामगार रंगभूमीवरील नाटककार- चंद्रकांत कनगुटकर, रंगमंच कामगार-पंदीप रांगणकर, व्यावसायिक अभिनेते- संजय मोने, गायिका अभिनेत्री- लता भोगले, संगीत नाटक- 'गोपालकृष्ण' (स्नेह-पुणे), पूर्णवेळ नाट्यसेवा- शरद पोंक्षे, उत्कृष्ट अभिनेत्री- भारती गोसावी, विनोदी लोकनाट्य कलावती- केशर जैनू चाँद, नाट्यसंगीत शिक्षक- शुभदा दादरकर, अन्नदाता पुरस्कार- प्रसाद कुलकर्णी, विनोदी लोकनाट्यकलावंत-सुनील गोडबोले, श्रेष्ठ कलावंत- मोहन आगाशे, गायिका अभिनेत्री- मधुवंती दांडेकर, गायक नट- सुभाष दसकरकर, सेवाव्रती रंगकर्मी- गजानन सगदेव, उत्कृष्ट दिग्दर्शक- दिलीप कोल्हटकर, विनोदी कलावंत- स्वरूपकुमार, रंगभूषाकार- शरद विचारे, सहाय्यक अभिनेत्री- शुभांगी गोखले, ज्येष्ठ नाट्यलेखक- गणेश हिर्लेकर, प्रायोगिक नाटककार- गिरीश जोशी, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक- मंगेश कदम, ज्येष्ठ नेपथ्यकार- पांडुरंग कोठारे. ❒

# साधंसुधं...

## गोष्टींची गोष्ट

**प्रमोदिनी वडके-कवळे**

एकदा चिमणा म्हणाला चिमणीला आपल्याला खीर कर.

चिमणी खीर ढवळायला बसली, तर तिला आली झोप आणि ती पडली खिरीत.

मग चिमणा लागला रडायला. म्हणाला चिमणा चिडी खीरमा पडी...

रडत रडत तो बाहेर गेला तर, वडाच्या झाडाने त्याला विचारलं, का रे बाबा रडतोस?

तसा चिमणा म्हणाला, चिमणा चिडी. खीरमा पडी...

त्याचं रडणं ऐकून वडाला पण वाईट वाटलं. त्याची सगळी पानं झडून गेली.

तेवढ्यात एक गाय तिथे आली. वडाच्या झाडाकडे बघून तिला हसू आलं.

तसा वड म्हणाला चिमणा चिडी. खीरमा पडी. वडपान झडो. गायशिंग मोडो.

त्याबरोबर गायीचं शिंग मोडलं...

आजीची गोष्ट नेहमीच्याच वळणाने पुढेपुढे सरकायला लागली तशी आमचे डोळे पेंगायला सुरुवात झाली. हळूहळू एकेकाचे हुंकार मंदावत गेले आणि गोष्टीचा शेवट ऐकायला कुणीच जागं राहिलं नाही!

दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीतला हा हमखास रंगणारा कार्यक्रम. नातवंडं सुटीला आल्याचा आनंद एवढा असायचा, की अबोल आणि अक्षरशत्रू आजीच्या प्रतिभेला अशी काव्यात्मक पालवी फुटायची. दरवर्षी आमचा गोष्ट ऐकायचा हट्ट आणि आजीची तीच ती एकुलती एक गोष्ट.

आजही मला ही गोष्ट अगदी सगळीच्या सगळी आठवत असली, तरी कधीही मी किंवा आम्ही कोणत्याच भावंडांनी ती एकाच वेळी संपूर्ण ऐकलेली नाही. कधी गादीवर मस्ती करताना फक्त मध्यच ऐकला जायचा. तर कधी एकमेकांशी गप्पा मारण्याच्या नादात नुसता शेवटच कानावर पडायचा. कधीकधी तर इतकी झोप आलेली असायची की सुरुवातीच्या दोनचार वाक्यातच विकेट पडायची. तरीही ती गोष्ट संपूर्ण आठवायचं कारण म्हणजे ती मनात कुठेतरी खोलवर रुतून बसलेली आहे. खरं म्हणजे केवळ अर्थहीन पण लयदार वाक्यांपलीकडे त्या गोष्टीत दुसरं काही नव्हतं. उलट खीर ढवळताना चिमणीने खिरीत पडणं, चिमण्याच्या शापाने झाडाची पानं गळणं असल्या अविश्वसनीय घटनाच तर भरलेल्या होत्या. ज्यांचा आजच्या जगण्याशी काडीचाही संदर्भ नाही.

मग असं काय होतं त्या गोष्टीत की ती मनावरून पुसलीच जाऊ नये?

मनाची कोवळीक आणि अशा अविश्वसनीय गोष्टींवरही विश्वास ठेवण्याची निरागस वृत्ती!... बालपण या दोन गोष्टींवरच तर उभं असतं. म्हणूनच कोणत्याही युगातल्या लहान मुलांना परीकथा खऱ्या वाटतात. उडते गालिचे, बोलणारा हंडा, गाणारं झाड या वस्तू जगाच्या कोपऱ्यात कुठेतरी अस्तित्वात असतीलच याची खात्री वाटते. कोणत्याही चमत्कारावर चटकन विश्वास बसतो.....लहानपणीच्या गोष्टीतली राजकन्या जवळची वाटते आणि तिच्या सावत्र आईला मारून टाकावंसं वाटतं तेही याचमुळे!

समाजाच्या सगळ्या थरातल्या बालकांना मिळणारी एकच समान गोष्ट म्हणजे लहानपणी ऐकलेल्या गोष्टी. कुठल्याही युगातलं, कुठल्याही परिस्थितीतलं लहान मूल असू दे. गोष्टी ऐकल्याशिवाय त्याचं बालपण पुरंच होऊ शकत नाही. बालपण रम्य वाटायला लावण्यात बालकथांचा फार मोठा सहभाग आहे.

गोष्ट ऐकण्याची उत्सुकता हा मानवाचा सनातन स्वभाव आहे. कल्पक मनाच्या जागेपणाची ती खूण आहे. कधीही, कुठेही, कुणी काही किस्सा सांगायला लागला की, नकळत आपले कान टवकारतात. कोणतंही तत्त्वज्ञान गोष्टीच्या साखरपेरणीतून पुढं आलं तर आपल्याही नकळत आपोआप ते मेंदूपर्यंत पोचतं. तिथं रुतून रहातं.

''नेहमी खऱ्याचाच विजय होतो, दुसऱ्याचं वाईट केलं की आपलंही वाईट होतं, गरीबी धट्टीकट्टी आणि श्रीमंती लुळीपांगळीच असते.'' हे बालपणीच्या वेगवेगळ्या गोष्टींतून मनावर ठसवले गेलेले नैतिक नियम धादांत खोटे आहेत हे पुढे वास्तवाला सामोरं गेल्यावर कळून आलं... पण तरीही अजून मन मात्र ते मानत नाही. अजूनही आपण चांगलं वागलं की जग चांगलं वागतं असा विश्वास मनात तग धरून आहेच. तो एवढ्याचमुळे की काहीही झालं तरी त्या निरागस वयात ऐकलेल्या गोष्टींचा पगडा अजून मनावरून जात नाही.

मानसशास्त्रज्ञांच्या मते, प्रत्येक माणसात दोन परस्परविरोधी व्यक्तिमत्त्वं नांदत असतात. एक व्यक्त आणि दुसरं सुप्त! एखाद्या फळाच्या नखाएवढ्या बीजात जसा त्याचा पूर्ण वृक्ष लपलेला असतो, तशीच प्रत्येकाच्या सुप्त व्यक्तिमत्त्वात त्या त्या व्यक्तीला आकर्षक पण अशक्य वाटणारी स्वप्नं दडलेली असतात. बालपणीच नव्हे तर मोठेपणीही ऐकलेल्या गोष्टींतून ती सुप्त स्वप्नं नकळतपणे कुरवाळली जातात. म्हणूनच माणसाला गोष्टी ऐकण्याची मन:पूर्वक आवड वाटत असावी. गोष्ट ऐकायला आवडत

नाही असं लहान मूल मी तरी अजून पाहिलेलं नाही. हां.... गोष्टींच्या विषयांची आवड भिन्न असू शकते. कुणाला रडक्याच गोष्टी ऐकायला आवडतात, तर कुणाचं म्हणणं आधीच आयुष्यात ताणतणाव असताना उगीच अश्रूंना आमंत्रण कशाला द्यायचं?

माझ्या एका मैत्रिणीची वाचनाची आवड अजब होती. ती मनोभावे चांगल्याशा वाचनालयाची सभासद व्हायची. वेळेवर वर्गणी भरायची. पण तिथल्या मुलीला बजावून सांगायची, ''तुझं वाचून झालेलंच पुस्तक मला देत जा बाई. ज्यांचा शेवट गोड असेल अशाच कथाकादंबऱ्या मला आवडतात.''

आणि गंमत म्हणजे काहीही झालं तरी या गोष्टीचा शेवट सुखान्त होणार आहे हे शंभर टक्के ठाऊक असूनही ती शेवटपर्यंत 'पुढे काय?' अशा उत्सुकतेने ते पुस्तक वाचायची.

गोष्टींच्या बाबतीत आणखी एक गमतीची गोष्ट म्हणजे बहुतेक वाचकांना आवडलेल्या कथाकादंबऱ्या पुन: पुन: वाचायला आवडतात. माझ्या मुलाला तर लहानपणी दुपारचं खाणं खाताना ऐतिहासिक कथांचं ठराविक पुस्तकच वाचायला आवडायचं आणि जेवताना विनोदी कथांचं. आता त्याचा तसा हट्ट राहिला नसला तरी, तोंड हलवताना समोर कथाकादंबरी लागतेच. याला केवळ वाचनाची सवय म्हणावं तर, जेवणाबरोबर अभ्यासाचं पुस्तक मात्र 'पचत' नाही. जूनच्या अगदी सुरुवातीला फारतर मराठीच्या पुस्तकाचं तोंडीलावणं चालवून घेतलं जातं.

अर्थात मराठीच्या पुस्तकाची आवड हा त्याच्यात आलेला आनुवंशिक गुण म्हणावा लागेल. कारण परीक्षेचा निकाल लागायचा अवकाश! मी लग्गेच शेजारपाजारच्या वरच्या वर्गातल्या मुलांकडून मराठीचं पुस्तक पैदा करायची आणि त्यातले कथारूप धडे वाचून काढायची. मात्र असं वाचताना सुख देणाऱ्या या कथा धडे म्हणून समोर आल्या की फारच त्रास द्यायच्या. थोडक्यात उत्तराचे प्रश्न, सविस्तर प्रश्न, संदर्भासहित स्पष्टीकरण, टीपा.. कथेच्या गुलाबाला किती काटे असावेत? त्या काट्यांमुळे धड्यातला 'गोष्ट'पणाचा सुगंधच हरवून जायचा.

गोष्टीच्या आकर्षणाचं मूळ असतं ते तिच्यातल्या कल्पनारम्यतेत आणि आपल्याला हवा तसा अर्थ लावून घेण्याच्या स्वातंत्र्यात! एकच गोष्ट प्रत्येकाला वेगवेगळी वाटते, पटते. चिमणाचिमणीची गोष्ट पावसाळ्याआधी घर मेणासारख्या पदार्थांनी वॉटरप्रुफ करून घ्यावं असा व्यावहारिक संदेश देणारीही वाटू शकते, तर कुणाला त्यातल्या कावळ्याच्या वागण्यात पुरुषी वरचष्मा दिसू शकतो. मेणाच्या घरात राहून कावळ्याची



अरेरावी सहन करणारी चिमणी हे कुणाला युगायुगांच्या शोषितांचं प्रतीकही वाटू शकतं.. कारण त्याचा ठराविकच अर्थ लावण्याचं बंधन तुमच्यावर नसतं.

लहान असताना भाबडेपणाने ऐकलेल्या लोककथांवर आता विचार करायला गेलं की, लक्षात येतं वेगवेगळ्या भाषाप्रदेशातल्या कितीतरी गोष्टींचं एकमेकींशी कमालीचं साम्य आहे. केवळ तपशीलांचाच काय तो फरक. कारण मानवी भावना हे कुठल्याही परिस्थितीत आणि कुठल्याही प्रदेशातल्या भूमीवर एकसारखंच पिकणारं पीक आहे. सिंड्रेला आणि सोनसाखळी, बिरबल आणि तेनालीराम, ठकसेन आणि रॉबिनहूड, सिंहासनबत्तीशी आणि अरेबियन नाईटस्, पंचतंत्र आणि इसापनीती, खिरीतली चिमणी आणि शेपूटतुटका उंदीर... कितीतरी उदाहरणं. चांदोबासारखं बालकथांना वाहिलेलं मासिक जगातल्या सोळा भाषांत निघू शकतं आणि हॅरी पॉटरच्या गोष्टींचा आनंद लुटताना इंग्रजी कच्चं असलं तरी अडत नाही. याचा अर्थ एकच की प्रत्येक वयाची मानसिकता जगाच्या पाठीवर कुठेही गेलं तरी एकसारखीच असते. त्याला भाषेचा अडसर नसतो.

आजोळ ही संस्था आता नाहीशी होत चालल्याची खंत बरेचदा कितीकांच्या बोलण्यात येते. पण मला त्याचबरोबर आजीच्या आवाजातली गोष्टही नाहीशी होतेय याचं जास्त वाईट वाटतं. कारण व्यावसायिक युगात काही लोकांनी सुटीपुरता मामाचा गावसुद्धा भाड्याने मिळेल याची सोय केली आहे. मामाच्या त्या भाडोत्री गावात आजोळसारखी दंगामस्ती करायला वाव असेल कदाचित, पण आजीच्या थरथरत्या आवाजातली ही गोष्ट मिळेल? त्यासाठी ध्वनिफिती काढता येतील म्हणा. पण अंगावरून मधेच फिरणाऱ्या आजीच्या खरखरीत सुरकुतल्या हाताचा स्पर्श, तिच्या नऊवारी लुगड्याची 'प्युअर कॉटन' ऊब, दात नसलेल्या बोळक्यात फिरणाऱ्या पानसुपारीचा वास... हा सगळा फील त्या ध्वनिफितीतून नक्कीच येणार नाही.

शाळेला उन्हाळ्याची सुट्टी, आजोळचा लाडाकोडाचा पाहुणचार, गच्चीतलं मोकळं वारं, अंगणात मध्यरात्री उमलत जाणाऱ्या मोगऱ्याचा घमघमाट आणि वरच्या आभाळातून वाकून बघणाऱ्या चांदण्या... या सगळ्याचा गुणाकार केल्यावर जी संख्या येईल त्यात आजीच्या थरथरत्या आवाजातली गोष्ट मिळवायची... येणारं उत्तर म्हणजेच सुख! त्याला हे सुख मिळालं, त्याचं आयुष्य भरून पावतं.

कारण यातून कितीही, काहीही वजा केलं तरी हे सुख कमी होत नाही. ❐




*** 'शीघ्रकवी' विश्वनाथ देशपांडे**

प्रख्यात वक्त्यांच्या भाषणावर तात्काळ काव्यात्मक भाष्य करण्याच्या सिद्धीमुळे आचार्य अत्रे यांच्याकडून 'शीघ्रकवी' पदवी मिळालेले कवी विश्वनाथ दत्तात्रय देशपांडे (वय ९४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. शंकराचार्य, आचार्य अत्रे यांच्यापासून विठाबाई नारायणगावकर यांपर्यंत सर्व क्षेत्रातील दिग्गजांच्या भाषणांवर आणि त्या निमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर देशपांडे काव्यात्मक भाष्य करीत. रामदास स्वामींचे साहित्य तसेच गोंदवलेकर महाराजांच्या ३६५ प्रवचनांवरही त्यांनी काव्ये लिहिली होती. गदिमांच्या 'एका तळ्यात होती...' या गाण्यावर केलेल्या काव्याने देशपांडे यांना गदिमांची दाद मिळाली होती.

मुक्तछंद, या व इतर छंदांमध्ये देशपांडे काव्य करीत असत. त्यांचा 'मेजवानी' हा काव्यसंग्रहही प्रसिद्ध झाला होता. गोखले शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून काम करतानाच त्यांनी 'इंकरिफिलिंग'चा शोध लावला होता. टाईपरायटर आणि तात्कालिक मुद्रणयंत्रामध्ये शाई भरण्याच्या त्यांच्या या संकल्पनेने व्यवसायाचे स्वरूप घेतले होते.

*** 'तांडा'कार आत्माराम राठोड**

फुले आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते व प्रसिद्ध साहित्यिक 'तांडा'कार आत्माराम कनिराम राठोड उर्फ डॅनिअल राणा (वय ५५) यांचे ता.२३ मे रोजी यवतमाळ येथील रुग्णालयात उष्माघाताने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुसदजवळील नंदपूर-मोहा येथे अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुली व एक मुलगा आहे.

आत्माराम राठोड यवतमाळ शहराजवळील लोहारा येथील देवांगण सोसायटीत वास्तव्यास होते.

नंदुरबार येथे २००३ मध्ये झालेल्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. त्यांनी आतापर्यंत बायबलमधील सामाजिक संदर्भ आणि भारतीय भटके, ख्रिस्ती धर्माचे गाणे व अभंग, गोरबंजारा पुस्तक, बायबलच्या पहिल्या तीन करारांचे बंजारा भाषेत रूपांतर केले. 'तांडा' कादंबरीसह त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. ❐



## ठिपके जोडा आणि तुमच्या आवडीच्या रंगांनी मस्त रंगवा!

